❑ मुख्य संपादक ❑
अरविंद भंडारे

❑ संपादकीय मंडळ ❑
दिलीप सावंत
विशाल मोरे
रोहीणी जुवाटकर - भंडारे
शांतारामजी इंगळे
देवदत्त कांबळे
जगन्नाथ काळे

❑विधी सल्लागार ❑
अनिल वैद्य (माजी न्यायाधिश)

❑प्रकाशक ❑
पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई

❑सल्लागार मंडळ❑
नागसेन गमरे, अरुण वाघमारे, अरुण साळुंके, रॉकेश यादव, रामचंद्र सकपाळ, विश्वास सरोदे, प्रमोद पोळ

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
अरविंद भंडारे
५४/७८, बी. डी. डी. चाळ,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.
भ्रमणध्वनी: ९९६७६९२०१४

Email : paliresearchinstitute@gmail.com
Website : www.paliresearchinstitute.com

हे त्रैमासिक पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई यांनी खाजगी वितरणाकरीता छापून **पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई** ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - ४०० ०१८. येथून प्रसिद्ध केले. या **त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

**किंमत रु. ४०/-**
**वार्षिक वर्गणी रु. १६०/-**
**पंचवार्षिक वर्गणी रु. ८००/-**
**आजन्म वर्गणी रु. ५०००/-**

❑मुखपृष्ठ सजावट ❑
अमोल सुर्यकांत कांबळे

❑अक्षर जुळणी ❑
पी.सी.मॅन

*पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई चे मुखपत्र*

# बुद्धसासन

**त्रैमासिक**

वर्ष ४ थे अंक १२ वा एप्रिल ते जून, २०२१ बुद्धाब्द २५६४-६५

## *अनुक्रमणिका*

✠ संपादकीय ३
✠ पालि वाङ्मयाचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव ५
डॉ. मालती साखरे
✠ डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन ७
- डॉ. भदन्त सावंगी मेधंकर
✠ दक्षिण भारतातील प्रमुख बौद्ध स्थळ नागार्जुन कोंडा, सन्नती, अमरावती १०
- अरविंद भंडारे
✠ धर्मांतरित बौद्ध या समूहाला धर्मांतरित बौद्ध म्हणून महार न लिहता केंद्राचे आरक्षण मिळाले पाहिजे. १२
- अनिल वैद्य, माजी न्यायाधिश
✠ बोधगयेच्या पवित्र भुमिवरील अखिल भारतीय भिक्खु संघाच्या विद्यमान विहारास दानाचे आवाहन... १६
- शांतारामजी इंगळे, मलकापूर
✠ धम्म चळवळीतील युवकांची भूमिका २१
- अमित मेधावी, कोल्हापूर
✠ सर्वव्यापी डॉ. बाबासाहेब आंबेडकर २४
- गौतम कदम, नवी मुंबई

### वर्गणीदारांना विशेष सुचना

वार्षिक वर्गणी/आजन्म वर्गणी - पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - १८ या पत्त्यावर मनिऑर्डरने किंवा बँक खात्यावर जमा करु शकता.

**Bank Name :** ABHYUDAYA CO. OP. BANK LTD.
**ACCOUNT NAME:** PALI RESEARCH INSTITUTE MUMBAI
**AC NO. :** 013011100064813
**BRANCH:** WORLI
**IFSC CODE:** ABHY0065013
**GOOGLE PAY NO.:** 9967692014

वर्गणीदारांना अंक स्पीड पोस्टने घरपोच हवा असल्यास संपादकांना फोन करुन स्पीड पोस्ट चार्जेस विचारुन पाठविणे.

वर्गणीदारांनी नुतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठविताना आम्हांस सूचित करावे.

# पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा

पालि भाषेचा प्रचार व प्रसार जन सामान्यांपर्यंत व्हावा या सद्हेतूने स्थापन झालेल्या पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबईच्या वतीने दोन दिवसांची पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा वेगवेगळ्या शहरात/ गावात घेतली जाणार आहे.
तरी पालि भाषा व ब्राह्मी लिपी प्रेमी यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य फायदा घ्यावा.
कार्य शाळेची फी नाममात्र असेल.

अधिक माहितीसाठी खालील भ्रमणध्वनीद्वारे किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

Email : paliresearchinstitute@gmail.com
Web : www.paliresearchinstitute.com

**अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४**

प्रिय, जाहिरातदार,

सप्रेम जय भिम,

उपरोक्त संस्थेच्या वतीने पालिभाषेचा पर्यायाने बौद्ध धम्माचा प्रचार सर्वसामान्यांपर्यंत व्हावा. या हेतुने बुद्धसासन नावाचे त्रैमासिक सुरू केले आहे. हे त्रैमासिक पालि भाषेचा, बौद्ध धम्माचा इतिहास, आदर्श संस्कृती, कला, वाङ्‌मय व तत्वज्ञान इत्यादिंना संपूर्ण वाहिलेले आहे. तसेच त्यात महिला व तरूण यांच्यासाठी वेगळे सदर असतील. आपल्या सारख्या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांनी या त्रैमासिकात आपली जाहिरात प्रसिद्ध करून व वार्षिक/आजन्म सभासद बनून समाज प्रबोधनाच्या या कार्यात सहभागी व्हावे हीच आपणांस नम्र विनंती.

आपण जाहिरात देऊन या पवित्र कामास हातभार लावाल ही खात्री आहे.

**जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| पान | दर रूपये |
|---|---|
| मुखपृष्ठ बाहेरील (रंगीत ) | ४,०००/- |
| मलपृष्ठ आतील (रंगीत ) | ३,०००/- |
| संपूर्ण आतील पान | २,०००/- |
| अर्धे पान | १,०००/- |
| पाव पान | ५००/- |

**आपला धम्मबंधू**
**संपादक**

## संपादकीय

***मी माझे आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धम्माच्या प्रचारात व्यतित करण्याचे ठरविले आहे.***

२० व्या शतकात भारतातील सर्वात प्रमुख बौद्ध नेत्यांमध्ये विद्वानांमध्ये व बौद्ध उपासकांमध्ये भारतात बुद्ध धम्माचे चक्र गतिमान करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रणी आहे.

१४ ऑक्टोबर १९५६ ला आपल्या लाखो अनुयायांसह बुद्ध धम्म स्विकारण्यासोबतच बाबासाहेबांनी भारतात बुद्ध धम्माच्या पुनरुत्थानासाठी अनेक कार्ये केली याचा आढावा आपण सदर लेखात घेणार आहोत.

बुद्धकाळापासून ते इसवी सनाच्या दहाव्या / बाराव्या शतकापर्यंत बुद्ध धम्म हा भारताचा प्रमुख धर्म होता. परंतु १२ व्या शतकानंतर बुद्ध धर्मावरील ब्राह्मण धर्माच्या प्रतिक्रांतीमुळे तसेच परकीय आक्रमणांमुळे बुद्ध धम्माचा भारतातून लोप झाला व तो येथील जनमाणसाच्या विस्मृतीत गेला. १९ व्या शतकाच्या मध्यात इंग्रज अभ्यासकांमुळे व अनागरीक धम्मपाल सारख्या बौद्ध भिक्षूंमुळे भारतात बुद्ध धम्माच्या चळवळीचा प्रचार होऊ लागला. याच दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील अस्पृश्यांच्या उद्धारांचे कार्य करत होते. जेव्हा त्यांना हिंदु धर्मात कोणताही बदल होत नाही हे जाणवले तेव्हा त्यांनी **'ज्या धर्मात मी जन्मलो. त्या धर्मात मी मरणार नाही,**. अशी प्रतिज्ञा केली. तो काळ भारताचा स्वातंत्र्याकडे वाटचाल करणारा व एक नवीन भारत निर्माणाचा काळ होता. आधुनिक भारताच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावत असतानाच बाबासाहेबांनी एका बाजूने २०-२२ वर्षे सर्व धर्माचा तौलानिक अभ्यास देखील केला व बुद्ध धम्माप्रती विशेष आदर व प्रेम निर्माण होऊन त्यांनी हा मानव मुक्तीचा धर्म स्विकारण्याचा निर्णय घेतला.

बाबासाहेबांच्या अनुयायांसाठी हा धर्म (बौद्ध) नवीन होता. या धर्माचे लोकांना आकलन व्हावे तसेच या धर्मातील निती नियम आचार लोकांना कळावे म्हणून बाबासाहेबांनी अनेक ठिकाणी परिषदांत सभेत बुद्ध धम्मावर व्याख्याने दिली. १९५२-५४ दरम्यान रंगून येथे झालेल्या ६ व्या बौद्ध धम्म संगितीस बाबासाहेब आवर्जून उपस्थित राहिले. ५ फेब्रुवारी १९५६ रोजी दिल्ली येथील बुद्ध विहारात महाबोधी सोसायटीच्या कार्यक्रमात बाबासाहेबांनी व्याख्यान दिले. १८ मार्च, १९५६ चे आग्रा येथील भाषण खूप गाजले. १९५४ साली श्रीलंकेत त्यांना बौद्ध भातृत्व परिषदेच्या समारंभात व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले. श्रीलंकेतून येताना बाबासाहेबांनी आपल्यासोबत अनेक बौद्ध ग्रंथ आणले होते. त्यांनी श्रीलंकेतून रेकॉर्डकरुन आणलेल्या बौद्ध सुत्तांच्या पठणाच्या कॅसेट (डिस्क) हे त्यातील प्रमुख आकर्षण होते.

२० नोव्हेंबर १९५६ रोजी काठमांडू, नेपाळ येथे बाबासाहेबांनी **'बुद्ध की कार्ल मार्क्स,** या विषयावर अजरामर व्याख्यान दिले. जे आज देखील छोटेखानी ग्रंथ रुपाने उपलब्ध आहे. बाबासाहेबांनी आपल्या व्याख्यानातून बुद्ध धर्माचा भारतात उदय व विकास, धर्माचे महत्व व हा धर्म मानवमुक्तीचा धर्म कसा यासंबंधी अतुलनीय मार्गदर्शन केले आहे. व्याख्यानासोबतच बाबासाहेबांनी **'बुद्ध आणि त्यांचा धम्म, बौद्ध उपासना पाठ,पालि भाषेचा शब्दकोश व व्याकरण,** असे ग्रंथ लिहून फार मोलाचे कार्य केले आहे. अथांग महासागरासारख्या विस्तृत असलेल्या बौद्ध साहित्यात **'बुद्ध आणि त्यांचा धम्म,** हा ग्रंथ संपूर्ण भारतातील बौद्धांचा एक मार्गदर्शक ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे. बौद्ध ग्रंथाच्या मुद्रणाकरिता त्यांनी **'बुद्ध भूषण प्रिंटींग प्रेस,** ची निर्मीती केली.

कोणताही धर्म हा त्याची प्रतिके संस्कृती सोबत घेऊनच उदय पावत असतो. आज अपण संपूर्ण भारतातच काय तर प्राचीन काळी प्रचलीत असलेल्या जम्बूद्विपात फिरलो तरी आपणास ठिकठिकाणी बौद्ध लेण्या, स्तूप, विहारे, संघाराम यांचे अवशेष पहायला मिळतात. बाबासाहेबांनी आपल्या जिवनकाळात सरकारच्या विविध पदांवर कार्य करताना भारतात अनेक ठिकाणी बौद्ध स्थळांना भेटी दिल्याचे संदर्भ उपलब्ध आहेत. मिलिंद महाविद्यालयाच्या उद्घाटनासमयी तत्कालीन प्रधानमंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासह बाबासाहेबांनी औरंगाबाद येथील जगप्रसिद्ध अजिंठा लेणीला भेट दिली होती. मुंबई येथील प्रसिद्ध कान्हेरी लेणी येथे बाबासाहेबांनी भेट दिल्याचे संदर्भ आहेत. जेथे प्रथम धम्मचक्र प्रवर्तन झाले त्या सारनाथ येथील धम्मेक स्तूपाच्या सावलीत २५ नोव्हेंबर १९५६ साली बाबासाहेबांनी व्याख्यान दिले होते. त्याच व्याख्यानादरम्यान भिक्षू धर्मरक्षित यांनी बाबासाहेबांना **'बोधिसत्व,** या पदाने संबोधित केले. १३ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर १९५६ या दरम्यान बाबासाहेब नेपाळच्या दौऱ्यावर होते त्याचसमयी त्यांनी जेथे भगवंतांचे महापरिनिर्वाण झाले त्या कुशीनगर ला भेट दिली होती. ज्या ठिकाणी बुद्धांना

ज्ञानप्राप्ती झाली त्या बोधगयेला जेव्हा बाबासाहेबांनी भेट दिली तेव्हा त्यांना गहिवरुन आले. संपन्न व समृद्धपणे नांदणाऱ्या बुद्ध धम्म व त्यांच्या विहारांची चैत्यांची प्रतिकांची अवस्था पाहून बाबासाहेब आपल्या एका भाषणात म्हणतात. **'बौद्ध धर्मातील अनेक तत्वे हिंदूनी आत्मसात केली प्रतिमा, चैत्य, विहार आणि भिक्षू इत्यादी दृष्टीने आज भारतात बुद्धधम्म नसला तरी तात्वीक रुपाने अजूनही तो भारतभर पसरला आहे,.**

बाबासाहेब आपल्या भाषणात नालंदा विद्यापिठा जवळील एका गावातील बुद्ध मुर्तीचा सुद्धा उल्लेख करतात जी परिवर्तित करुन तेलीया बाबा म्हणून प्रचलित करण्यात आली होती. याचदरम्यान बाबासाहेबांची व भिक्खू चंद्रमणी यांची भेट झाली होती. आज आपण पाहतो याचप्रमाणे संपूर्ण भारतवर्षात बुद्धांच्या मुर्तींना परिवर्तित करुन त्या हिंदू देवादिकांच्या नावाने पूजल्या जातात अशा गोष्टींना प्रतिबंध किंवा पुरातन वस्तूंचे स्थळांचे संरक्षण करण्याचे कलम संविधानात अनुच्छेद ४९ च्या रुपाने अस्तित्वात आहे. या कलमाला अनुसरुन पुरातत्व खात्याने आज कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

बौद्ध परिषदांत व्याख्यानाच्या माध्यमातून बुद्ध धम्मावर लेख प्रसारीत करुन ग्रंथ निर्मिती सोबतच बाबासाहेबांनी अनुसुचित जातीतील व इतर वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे याकरिता मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेजची उभारणी केली त्यात समृद्ध अशा ग्रंथालयाची निर्मिती सुद्धा केली. आज ७० दशकांहून अधिक काळ ही महाविद्यालये बौद्ध व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे माध्यम झाले आहे. दोन्ही महाविद्यालयातून पालि व बौद्ध शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. समाजामध्ये बौद्ध धम्माचे निती नियम रुजवण्यासाठी धार्मिक बाबींना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी समाजाला धर्माच्या एकसूत्रात बांधण्याकरिता बाबासाहेबांनी देशपातळीवर **'बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडीया,** या संघटनेची स्थापना केली. या संघटनेमार्फत देशभरात बुद्ध धम्माचे कार्यक्रम पार पाडले जातात.

भारतात बुद्ध धम्माच्या प्रचारासाठी बाबासाहेबांनी एक ब्लु प्रिंट तयार केली होती. त्या ब्लु प्रिंटप्रमाणे बाबासाहेबांनी कार्यवाही देखील सुरु केली होती परंतु बाबासाहेबांच्या महाप्रयाणाने त्या ब्लु प्रिंटची पूर्ण अंमलबजावणी अपूर्ण राहिली. आज जर त्या ब्लु प्रिंट प्रमाणे कार्य झाले तर भारतात बुद्ध धम्माच्या प्रचाराला वेग आला असता.

**या ब्लु प्रिंटमध्ये खालील बाबी अधोरेखित आहेत.**

१) बुद्ध धम्माचे बुद्धीस्ट गॉस्पेल निर्माण करणे.

२) धम्मदिक्षेचा विधी निर्माण करणे.

३) बौद्ध धर्मचारी निर्माण करणे, जे गृहस्थी असतील.

४) बौद्ध सेमिनरीची स्थापना.

५) प्रत्येक रविवारी विहारांतून बुद्ध पूजा व प्रवचनांचे आयोजन.


६) मद्रास, नागपूर, कलकत्ता, दिल्ली अशा चार प्रमुख शहरांत शाळा व कॉलेज निर्माण करणे.

७) बुद्ध धम्मावर निबंध स्पर्धेचे आयोजन करणे.

८) बुद्ध धम्माच्या प्रचारासाठी ग्रंथ निर्मितीसाठी प्रिंटींग प्रेसची स्थापना.

९) अनाथाश्रम, इस्पितळे, सहाय्य केंद्राची स्थापना करणे.

१०) बंधुभाव संवर्धन आणि कृती कार्यक्रमांच्या एकजुटतेसाठी सभा व परिषदांचे आयोजन करणे.



**२६ मे, २०२१ वैशाख पौर्णिमा 'भगवान बुद्ध' जयंती निमित्ताने सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा !**

# पालि वाङ्मयाचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव

*- डॉ. मालती साखरे*
*माजी विभागप्रमुख (पाली - पाकृत)*
*रातुम, नागपूर विद्यापिठ*

अनादी काळापासून मानवाने प्रगतीचा आलेख तयार केला. त्यापैकी सर्वात विकसित गोष्ट म्हणजे संस्कृती त्याने एक कल्चर निर्माण केले.

**Meaning of Culture: संस्कृतीचा अर्थ :-**

संस्कृती हा शब्द रोजच्या व्यवहारात आपण वापरतो. विशेष म्हणजे दैनंदिन व्यवहारात वेगवेगळ्या अर्थात हा शब्द वापरला जातो. परंतु समाजशास्त्रीयदृट्या त्याच्या वेगळ्या व्याख्या अनेक शास्त्रज्ञांनी केलेल्या आहेत.

डॉ. इरावती कर्वे, एडवर्ड टायलर, राल्फ लिग्टन, किसिंग बोगार्डेस, मॉलिनोव्हस्की यांच्या संस्कृतीबाबतच्या व्याख्या महत्वपूर्ण मानल्या जातात.

या संदर्भात एडवर्ड टायलर (Edward Tylor) चे मत असे आहे की, समाजाचा एक सदस्य म्हणून मानव जे ज्ञान, कला, श्रद्धा, नीतीतत्वे, कायदे, परंपरा, इतर क्षमता, सवयी तसेच इतर तत्सम गोष्टी संपादित करतो, त्या सर्वांच्या संमिश्र एकीकरणास संस्कृती असे म्हणतात.

समाजशास्त्रज्ञ हरस्कोव्हिटस (Herskovits) यांचे मते संस्कृती हा वातावरणाचा मानव निर्मित भाग आहे. Culture is the man made part of the environment.

बोगार्ड्स यांचे स्पष्टीकरण असे की, समुहाचे कार्य करणे आणि विचार करण्याच्या सर्व गोष्टी म्हणजे संस्कृती होय. त्याचप्रमाणे मॅलिनोव्हस्की म्हणतात की, ज्यांच्याद्वारे मानव आपली उद्दिष्टे साध्य करतो ती मानव निर्मित साधने व माध्यम म्हणजे संस्कृती होय. Culture is the hardwork of man and the medium through which he actives his ends.

**भारतीय संस्कृती :-**

शास्त्रज्ञांच्या या विविध मतांच्या आधारे भारतीय संस्कृती वैदिक, बौद्ध आणि जैन संस्कृतीचे समन्वित रुप आहे. अनेकात्मकता आणि विविधतेत एकात्मता आणि एकता तिची विशेषता आहे. यामुळेच त्यानंतर निर्माण झालेल्या संस्कृतीच्या प्रक्रिया ह्या एक दुसऱ्यांनी प्रभावित झालेली दिसते. याशिवाय प्रत्येक संस्कृतीने भारतीय संस्कृतीला आपल्या योगदानाने समृद्ध केले आहे.

बौद्ध धम्म आणि संस्कृती श्रमण संस्कृतीचे प्रेरक प्रणाली आहे. त्याचे प्रासाद सम (समानता) शम (शांती) आणि श्रम (परिश्रम) ह्या तीन प्रमुख स्तंभावर आधारित आहे. यानुसारच समाजाचे संघटन ह्या तीनही सिद्धान्तावर प्रतिष्ठित झाले आहे. विषमता विसरुन समानता, श्रमशीलता आणि क्षमाशीलता अशा कल्याणमार्गाने समाज आणि राष्ट्राने आपली प्रगती करावी याचे निर्देश यात आहे. व्यक्तीच्या श्रेष्ठत्वाचे प्रमाण त्याची ज्ञानमयकृती आणि चरित्र असावे. अहिंसात्मक साधनेने ह्या तिन्ही साधनेत निर्मलता वाढते आणि समत्वाची प्रतिष्ठा होते. हीच श्रेष्ठ भारतीय संस्कृतीची आधारशीला मानली जाते. ही संस्कृती पालि वाङ्मयातून प्रतिबिंबित होते. म्हणूनच पालि वाङ्मय हे विकसित भारतीय संस्कृतीचे प्रतिक मानल्यास पालि वाङ्मयाचा म्हणजेच बुद्धवचनाचा भारतीय संस्कृतीवर पोषक प्रभाव असल्याचे निदर्शनास येते.

**पाली वाङ्मय अर्थात बुद्धवचन :-**

पालि वाङ्मय हेच त्रिपिटक नावाने परिचित झालेले आहे. त्रिपिटक म्हणजे बुद्धवचन. भगवान बुद्धाच्या आविर्भावाच्या समकालीन परिस्थितीचे चित्रण विदारक होते. सहा संप्रदायाचे तत्वचिंतक आपापल्या स्तरावर समाजपरिवर्तनाची आपली जिज्ञासा व्यक्त करण्याच्या प्रयत्नात होते. अशा पार्श्वभूमीवर तथागताचे पदार्पण समाजाभिमुख ठरले.

तथागताने सर्वोत्तम ज्ञान, सम्बोधी प्राप्त करुन 'बुद्ध' पदाला पोहोचले. तत्कालीन ६२ मिथ्यादृष्टींचा पर्दाफाश केला. पंचेचाळीस वर्षे देशभर निरंतर भ्रमंती करुन धम्म प्रवेदित केला. त्या धम्मोप्पवेदित देसनेचे संकलित रुप त्रिपिटक वाङ्मय तयार करण्यात आले. यामधूनच बुद्धाचे प्रामाणिक व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होते. संगीतीच्या माध्यमातून त्यांच्या देसनेला वाङ्मयाचे रुप आकारात आणले गेले. हे संपूर्ण साहित्य म्हणजेच बौद्ध वाङ्मय विश्ववाङ्मयाचा एक अमूल्य निधी आहे.

सुत्तपिटकाचे पांचही निकाय, विनयपिटक आणि अभिधम्म यातून तथागताचे प्रामाणिक वचन दृष्टीगत होतात. यामधून बुद्धाचे प्रमुख चिंतन चार आर्यसत्य, आर्य अष्टांगिक मार्ग, कम्मक्खन्ध, प्रतित्यसमुत्पाद, शून्यवाद, अनित्य, अनात्म, दु:ख इत्यादीचे स्पष्टीकरण केलेले आहे. यासोबतच सामाजिक जीवनातील

अहिंसा, मैत्री, बंधुभाव, प्रेम, दान, शीलाचार अशा मूल्यांना प्रोपित केले. ह्या सर्व नैतिक मूल्यांचा, तत्वज्ञानाचा, आदर्शांचा सारासार उहापोह वाङ्मयातून झळकतो. अर्थातच हेच पालि वाङ्मय बुद्धवचन आदर्श समाज जीवनाची आधारशीला बनण्यास समर्थ ठरते.

**पाली वाङ्मयाचा प्रभाव :-**

भारतीय संस्कृतीच्या आचार, धर्म, भाषा, शिल्प, ललितकला, शासन आणि तत्वज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये बौद्ध पालि वाङ्मयाने एक नवीन विशेषता समाविष्ट करुन उन्नतीचा मार्ग गाठला आहे. भारतीय संस्कृतीच्या विकासाला व्यापक प्रेरणा मिळाली. त्याचप्रमाणे बुद्ध तत्वज्ञान हे एक गौरवमय अंगच मानले जाते; तो एक मूलभूत गाभा आहे. धम्मपदातील ब्राह्मणवग्गानुसार ब्राह्मण कोणाला म्हणावे याचे सत्य प्रारुप जगासमोर आलेले आहे आणि कृतीला महत्व प्रदान झाले. सामाजिक, धार्मिक-तात्विक अराजकता, नैतिक विडंबन, मिथ्याचार आणि वैचारिक दिशाभूल अशा अंधकारमय वातावरणात भारतीय समाज जेव्हा उद्विग्न झालेला होता, अशा समाजात पुन्हा प्रतिष्ठित, प्रस्थापितांना सम्यक् विचार देण्याचे महान कार्य भगवान बुद्धाने केले. याच विचाराच्या पार्श्वभूमीवर वैदिक तत्वांनी बुद्धाला अवताराच्या रुपाने मान्य करुन आपल्या तत्वज्ञानात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. कालानुरुप अशा परिवर्तनाच्या दिशेने भारतीय संस्कृती बुद्धाने प्रभावित झाली. संस्कृती संघर्ष होऊन वैचारिक आदान-प्रदानही झाले म्हणूनच जगातील अनेक प्राचीन संस्कृतीमध्ये बौद्ध संस्कृतीचे वैशिष्ट्य कायम स्थिरावलेले आहे. नैतिक मूल्य व तत्वज्ञानाच्या दिशेने संपूर्ण जग पालि वाङ्मयातील सूचक तत्वांनी प्रभावित झालेले दिसून येते विदेशातील सांस्कृतिक प्रचार-प्रसार आणि भारतीय संबंध हे बुद्धवचनाच्या प्रभावाने समृद्ध झाले. रक्तपाताशिवाय, सक्ती व बळाचा वापर न करता बुद्धाने आपल्या मैत्रीपूर्ण कल्याणकारी भावनेने सर्वांची मने जिंकली.

**संक्षेप :-**

'बहुजन हिताय बहुजन सुखाय, लोकांच्या हित व सुखासाठी त्यांनी आपल्या शिष्यांना विचरण करण्याचे संदेश दिले. तथागताच्या देसनेची सम्यक दृष्टी सामायिक कल्याणाची आहे. त्यांचा प्रत्येक क्षणाचा उपदेश व्यक्ती, मानवप्राणी केंद्रस्थानी ठेवून केलेला आहे. ज्ञान व सदाचार यांची प्रेरणा देणारा आहे. स्वत:च्या प्रज्ञेचा विकास करण्याचे चिंतन करणारा आहे.

बुद्धाच्या शिक्षापदाचा संसार यात आहे. सर्व प्रकारच्या वाईट कर्मापासून दूर राहणे कुशल कर्माचा संचय करणे, चित्ताला संयमित करणे हेच त्यांच्या शिक्षणाचे संचित आहे. या विशुद्ध विचाराने भारतीय संस्कृती निश्चितच प्रभावित आहे. डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन यांचे स्पष्ट मत आहे की, हिन्दु धर्माचा मान्यताप्राप्त ग्रंथ जो '**गीता**, आहे ते धम्मपद ह्या पालि ग्रंथाची नक्कल आहे. एक विध्वंसक सत्तेचा विषय सोडला तर संपूर्ण नैतिकतेचा आधार बुद्धधम्म आहे. त्याचप्रमाणे जातक कथांनी देशांतील नव्हे तर संपूर्ण लोककला साहित्याला प्रभावित केले इसापनीतीतील अनेक कथा ह्या जातककथांच्या पार्श्वभूमीवरुन सांगितल्याचे दिसून येते. भिक्खूंची विहारे ही निवासाची व्यवस्था किंवा स्तूप, चैत्य आणि लेण्या इत्यादीमधून भारतीय संस्कृतीला बुद्ध कर्तृत्वाचे देणे लाभलेले आहे. म्हणूनच असे म्हणता येईल की, जीवनप्रणालीची उत्कृष्ट व्यवस्था ही पालि वाङ्मयाची देसना आहे. तीच धारण करणे आज काळाची गरज आहे.

## त्यागमूर्ती रमाई

*त्यागामुळे तुझ्या*
*आला बागेला बहर*
*तुझ्या चरणी बघ*
*वाकला भिमसागर*
*केलेस तु सिंचन*
*फळे आली फांदोफांदी*
*तुझी लेकरे आता*

*विसावली बंगल्यामंदी*
*फाटक्या चिंध्यातून*
*पेरलेस मनुष्य धन*
*जिथे तिथे आता*
*शिक्षणाचे पीक महान*
*होतीस तुच*
*घडवलास भिम वाडा*

*इशाऱ्यावर त्याच्या*
*चालतो भारताचा गाडा*
*माता रमाई तुझ्या*
*त्यागाची झाली फळे, फुले*
*बाबांच्या या रामुमुळे*
*उद्धरली ही कोटी कुळे*

***- संध्या वैद्य***

# डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन

*- डॉ. भदन्त सावंगी मेधंकर*

बौद्ध वाङ्‌मयाला जनसामान्यात पोहचविणारे, बुद्ध धम्माचे प्रकांड पंडीताच्या रुपात ओळखले जाणारे डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन यांचा जन्म ५ जानेवारी १९०५ साली लाला रामशरणदास आणि फुलवंती देवी यांच्या घरी सुहाना गांव, अंबाला येथे झाला.

त्यांच्या लहानपणी त्यांचे नाव हरीनामदास असे ठेवण्यात आले होते. त्यांचे वडील शाळेत मास्तर होते. ते ज्या हिन्दु मोहमेडन शाळेत शिकवत असत त्याच शाळेत हरीनामदास यांचे नाव दाखल करण्यात आले. ते आपल्या वडीलांसोबतच शाळेत जात. त्यांची आई जास्त दिवस जगू शकली नाही. ती त्यांच्या लहानपणीच वारली.

हरीनामदास आणि त्यांचे भाऊ हरीदास आपल्या मामाकडे राहू लागले. वयाच्या १५-१६ व्या वर्षी त्यांनी मॅट्रीक पास केली व कॉलेजात प्रवेश केला. परंतु ते जास्त दिवस कॉलेजात जाऊ शकले नाहीत. तो काळ राष्ट्रीय आंदोलनाचा होता. भारताच्या स्वातंत्र्याची लढाई सुरु होती. विद्यार्थ्यांनी इंग्रजांच्या शाळा व कॉलेजांवर बहिष्कार घातला होता व स्वतंत्रतेच्या लढाईत सैनिक बनू लागले होते. काही दिवसानंतर हरीनामदास यांचे वडील ही वारले. १९२४ साली वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी बी.ए. ची परिक्षा उत्तीर्ण केली. लहान असताना ते मोठे होऊन वकील बनण्याचा विचार करत. पदवीधर झाल्यानंतर ते परिपक्व झाले. त्यांनी आपल्या भावी जिवनासंबंधी विचार केला. अन्य देश भक्त धनाचा संग्रह न करता जसा आपला चरितार्थ चालवतात त्याचप्रमाणे त्यांनाही आपला चरितार्थ चालवायचा होता. त्यांना असा उदरनिर्वाह निवडायचा होता ज्यात समाजाला अधिकाअधिक देऊन समाजाकडून कमीत कमी घेतले जाईल. त्यांनी आजीवन अविवाहीत राहून देश सेवा करण्याचे व्रत स्विकारले व उपजिविकेकरीता परिव्राजक किंवा साधू चा पेशा स्विकारण्याचा निर्णय घेतला. कारण या पेशात समाजाकडून रोटी कपडा घेऊन त्याच्या सेवेत तत्पर राहीले जाऊ शकेल.

त्यानंतर भन्तेजींनी लिहायला सुरुवात केली. उपदेशक, सरस्वती, देशके सारख्या वृत्तपत्रांत लिहता लिहता मद्रास कॉंग्रेस मधून भन्तेजी डॉ. राजेंद्र प्रसाद आणि काही लोकं श्रीलंकेत गेले. राहुलजी (रामोदार साधु) यांनी त्यांच्या राहण्याची फिरण्याची व खाण्याची व्यवस्था केली. श्रीलंकेत ५ जानेवारी १९२८ ला विद्यालंकार परिवेण येथे त्यांची प्रवज्जा झाली. विद्यालंकार परिवेण येथेच भन्तेजींचे अध्ययन झाले. श्रीलंकेच्या यात्रेत राहुल सांकृत्यायन (रामोदार साधू) यांच्या प्रभावामुळेच भन्तेजी बौद्ध भिक्षू झाले. त्यांचे जीवन व विचारधारेचा भन्तेजींच्या जिवनावर प्रभाव पडला होता. रामोदार साधू (राहूल जी) यांची प्रवज्जा तिबेट वरुन परतल्यानंतर १९३० साली झाली होती.

भन्तेजी एक सुधारणावादी बौद्ध भिक्षु होते. त्या काळात श्रीलंकेत काही तरुण श्रामणेर भिक्षु कर्मकांड, परंपरा विरोधी, क्रांतिकारी सुधारणावादी होते. भन्तेजी त्यांचे अनुमोदन करत असत. त्यांच्यात **'वालपोल राहुल'** श्रामणेर प्रमुख होते. श्रामणेर राहुल शाळांमध्ये, विहारांत तसेच अन्य सभांत जात त्यावेळी ते रुढीवादी कर्मकांड, जातिवाद व दैववाद या विरुद्ध व्याख्यान देत. श्रीलंकेत त्यावेळी प्रत्येक विहारासह देवालय सुद्धा असत. उपासक तेथे जाऊन पूजा करत व मन्नत मागत असत. तेथे एक पुजारी असत ज्याला **'कपुकार'** म्हटले जात. या प्रकारच्या विचारांच्या विरोधात एका भिक्षुने **'बुद्धगुणालंकार'** नामक काव्य लिहीले होते. ज्याचा भन्तेजींनी हिन्दीत अनुवाद केला आहे.

श्रीलंकेत भन्तेजींना दोन वर्ष झाले होते. त्या दिवसात भन्तेजींना धम्मदेसना देण्यासाठी निमंत्रण येत. विहारांत विशेष दिवशी जसे की पौर्णिमा विहाराचा वार्षिक उत्सव विशेष सण किंवा विशेष भिक्षुंचे उपदेश ऐकण्याकरीता मोठे आयोजन केले जात असत. जसे राहुलजी लंकेत **'दम्बद्विप पण्डितुमा'** या नावाने ओळखले जात तसेच भन्तेजी **'कुरुरहे आनन्द'** या नावाने ओळखले जात. श्रीलंकेत लोकांचा विश्वास आहे की कुरुराष्ट्र देशांतील लोकं बुद्धिमान असतात. याच कारणाने भगवान बुद्धांनी **'सतिपट्ठान'** सारख्या कठीण सूत्रांचा उपदेश कुरुदेशाच्या लोकांना दिला. काही दिवसांतच राहुलजी आणि आनन्दजी श्रीलंकेत बरेच प्रसिद्ध झाले होते. त्याचप्रमाणे भारतातही त्यांची कीर्ती पसरत चालली होती. मासिक वृत्तपत्रांतून दोघांचे लेख प्रसिद्ध होत होते. महाबोधी सभेच्या पदाधिकाऱ्यांनी एकमताने दम्बद्विप आणि आनन्दजींना युरोपात धम्मदूत नेमून पाठविण्याचा निर्णय घेतला. खास करुन अनागरिक धर्मपाल यांनी आनन्दजींना लंडन मध्ये पाठविण्याचा आदेश दिला.

युरोपात फ्रांसला रवाना झाल्यानंतर समुद्री यात्रेत भन्तेजींना खूप त्रास झाला. भन्तेजी शुद्ध शाकाहारी होते आणि जहाजावर शाकाहारी जेवण मिळणे कठीण होते. लालसागर, सुएज कालवा आणि भूमध्य सागर पार करत त्यांचे फ्रांसीसी जहाज २३ जुलै रोजी फ्रांन्सच्या मारमोई बंदरावर पोहचले. त्यानंतर ट्रेन ने पॅरीस

ला पोहचून तेथे दोन दिवस काही प्राच्यविद्य ना भेटले, तेथील काही स्मारकांना ही भेटी दिल्या. पॅरीसला ट्रेन व जहाजाची सफर करुन आनन्दजी व राहुलजी लंडनला पोहचले. त्यावेळी भन्तेजींचे वय २७ वर्षे ७ महिने व २२ दिवस इतके होते तर राहुलजी यांचे वय ३९ वर्षे ३ महिने १८ दिवस इतके होते. महाबोधि सभेचे बौद्ध मिशन, रिजेंट पार्क, ४१ ग्लास्टर रोड, लंडन चे निवास नव्या धम्मदूतांच्या स्वागतासाठी सुसज्ज होते. आतापर्यंत तिकडे जे धम्मदूत होते ते लंकेस परतले होते. काही जुने विद्यार्थी होते तर काही लंकेतून नवीन विद्यार्थी आले होते. त्या सर्वांमध्ये खूप उत्साह होता त्याठिकाणी खूप शोभा होती. सर्वात खाली तळघरात बौद्ध मिशनच्या मॅनेजर चे कार्यालय होते जे स्वयंपाक घराच्या जवळ असल्याकारणाने थंडीच्या दिवसात उबदार राहत असे ते केवळ आगीच्या गरमीनेच नाही तर लोकांच्या उपस्थितीमुळे सुद्धा. खाली दरवाजा समोर पायऱ्यांना लागून एक विहार होते. एका खोलीत मेणबत्ती आणि फुलांच्या प्रकाशात भगवान बुद्धांची मूर्ती विराजमान होती. सर्दीमुळे क्वचितच कोणी एखादा तास त्या खोलीत जाऊन बसत असे. जेव्हा थंडी नसे त्यावेळी विहारात जाऊन बसणाऱ्यांची संख्या वाढत असे. विहारासोबत तेथे एक हॉल होता ज्याचे नाव १९ व्या/ २० व्या शतकातील सर्वात मोठे धर्मप्रचारक **'अनागरिक धर्मपाल,** यांच्या नावावरुन **'धर्मपाल,**असे ठेवण्यात आले होते. त्या हॉलमध्ये आठवड्यातून तीन चार वेळा मिटींग होत असे. रविवारची मिटींग विशेष असे. सायंकाळी ६ वाजता इग्लंड चे स्त्री-पुरुष ज्यात काही भारतीय तसेच सिंहली सुद्धा असत त्या सर्वांना तिसरण पंचशील दिले जात असत, वंदना व व्याख्यान होत असत. धार्मिक प्रवचन दिले जात असत दोन्हींच्या शेवटी प्रश्नोत्तर होत. २ जुलै, १९३३ ला भन्तेजी कुमारी डालके आणि श्रीयुत आस्टर यांच्या निमंत्रणावरुन जर्मनीस गेले व तेथे त्यांनी बौद्धगृहात तीन महिने वर्षावास केला.

युरोपात जाण्यापुर्वी १९३०-३१ मध्ये एके दिवशी राहुलजींनी भन्तेजींना सांगितले आम्ही तिपिटकाला हिन्दीत आणण्याची पंचवार्षिक योजना बनविली आहे. तुमच्यासाठी **'अंगुत्तर निकाय,** आणि जातकाचा अनुवाद करण्याचे कार्य दिले आहे. चार भाग अंगुत्तर निकायाचे व ६ खंड जातक चे जवळ जवळ तीन चार हजार पृष्ठ. सर्व प्रथम त्यांनी महावंस चा पालितून हिन्दीत अनुवाद केला नंतर जातकाला हात लावला. हे काही सोप्पं काम नव्हतं परंतु त्यांनी हिंमत हारली नाही. सकाळी नाष्टा झाल्यावर १०.३० वाजल्यापासून ते ११.०० वाजेपर्यंत अर्ध्या तासात आंघोळ, ११.३० वा. भोजन, एक तास आराम पुन्हा १.०० वाजल्यापासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लिखाण. ६ ते ७ वाजेपर्यंत शतपावली ७.३० वा. एक ग्लास दूध पिऊन ८ ते १२ वाजेपर्यंत पुन्हा अनुवादाचे कार्य, पुन्हा सकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत शतपावली या प्रकारे रोज १२ तास जातकाचे अनुवाद करत असत. याच मध्यात त्यांना पिनांग, मलेशिया येथे वर्षावास करण्याचे निमंत्रण मिळाले.

सन १९२८ ते १९३५ पर्यंत भन्तेजी अनेक ठिकाणी फिरत होते. अधिक दिवस एकाच जागी राहू शकले नाहीत. महाबोधी सभेचे सेक्रेटरी आयु. देवप्रिय वलिसिंह यांचा आग्रह होता की भन्तेजींनी सारनाथ ला राहून तेथील काम त्यांनी पाहावे व भारतात धम्मदूत चे कार्य करावे. सन १९३५ च्या आरंभी ते सारनाथला राहू लागले. याचवेळी महाबोधि तर्फे **'धर्मदूत,** मासिक प्रकाशित व्हायला सुरुवात झाली. संपादकाच्या जागी भिक्षु धर्मज्योतिजी यांचे नाव छापले जात परंतु सर्व संपादनाचे कार्य भन्तेजी पाहत. **'धर्मदूत,** मासिकात भिक्षुचे पत्र यात योगेंद्र नावाच्या काल्पनिक जिज्ञासूंच्या प्रश्नांना उत्तर दिले आहेत. यांत कठीणातील कठीण विषय सुद्धा साध्या सोप्या पद्धतीने समजावला आहे.

श्रीलंकेतून परतल्यावर त्रिमूर्ति राहुल सांकृत्यायन, भदन्त आनन्द कौसल्यायन आणि जगदीश काश्यप यांनी एक कॉफ्रेंन्स करुन भारतात बुद्ध धम्माच्या प्रचारांचे काम वाटून घेतले. जगदीश काश्यप म्हणाले, मी संस्था निर्माण करुन पालि साहित्याचे प्रकाशन करुन बुद्ध धम्माचा प्रचार करणार, आनन्द भन्तेजी म्हणाले मी गावागावांत, शहरा शहरांत फिरुन भाषणांद्वारे प्रवचनाद्वारे बुद्धांच्या शिकवणूकीचा जनतेत प्रचार करेन. राहुलजी म्हणाले, मी पालि साहित्य हिन्दीत अनुवादीत करुन त्याद्वारे बुद्ध धम्माचा प्रचार प्रसार करेन. तिघेही एका संस्थेप्रमाणे होते. तिघांनी इतके काम केले जे तिनशे भिक्षु मिळून सुद्धा करु शकत नाहीत. जगदीश काश्यप यांनी नवनालंदा महाविहाराची स्थापना करुन त्याद्वारे पालि पिटक साहित्याचे प्रकाशन तथा संपादन केले. राहुल सांकृत्यायन यांनी विशाल साहित्य निर्माण केले व आनंद भन्तेजींनी निरंतर फिरुन प्रवचने व भाषणाद्वारे बुद्ध धम्माला जनसामान्यांपर्यंत पोहचवले याप्रकारे तिघांनी आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

भन्तेजींनी सन १९४०-४१ या वर्षात मौलिक लिखाण आणि अनुवादाचे कार्य भरपूर प्रमाणात केले. हिन्दी साहित्य सम्मेलनाच्या वतीने जातकाचा प्रथम भाग प्रसिद्ध झाला होता. त्याचसोबत काही छोटी परंतु महत्वपूर्ण पुस्तकं सुद्धा तयार झाली होती. काही प्रकाशित सुद्धा झाली होती. त्या दिवसांत भन्तेजी हिन्दी साहित्य सम्मेलन व नागरी प्रचारणी सभा, काशी सह खूप

जोडले गेले होते. जातकाचा दूसरा भाग नंतर सम्मेलनाने प्रकाशित केला. **धम्मपद, बुद्ध और उनके अनुचर, भिक्षुंचे पत्र, बुद्ध वचन** आणि **यह छूत छात** प्रकाशित झाले होते. भदन्त आनन्द कौसल्यायन यांना राष्ट्रीय भाषा प्रचार समिती. वर्धा चे मंत्री म्हणून निवडण्यात आले होते.

१९५४ सालाच्या शेवटी बर्मा येथे झालेल्या तिसऱ्या बौद्ध सम्मेलनात भन्तेजी कलकत्ता येथून रंगून ला गेले होते. १९५० मध्ये श्रीलंकाची राजधानी कोलम्बो येथे विश्व बौद्ध सम्मेलनाचे पहिले अधिवेशन झाले. १९५२ साली निप्पोन (जपान) ची राजधानी टोकीयो व क्योतो येथे दूसरे अधिवेशन झाले. बर्मामध्ये तिसरे अधिवेशन समाप्त झाले. या तिन्ही देशात भन्तेजींना संम्मेलन पाहण्याची संधी मिळाली. त्यात सर्वात महत्वूपर्ण भाग त्यांना बर्माचा वाटला.

१९५६ च्या दिक्षा समारंभात भन्तेजी उपस्थित राहू शकले नाहीत. त्यासमयी ते भारताबाहेर होते. भन्तेजी १९६८ पासून नागपूरात स्थायिक झाले. इथे ते काहि दिवस दिक्षाभूमीत राहिले. नंतर कामठी रोड स्थित बुद्ध भूमीत १९८३ पासून स्थायिक झाले. भिक्षु निवास दिक्षाभूमी येथे राहत असताना त्यांनी अनेक महत्वपूर्ण पुस्तकाचे लेखन, प्रकाशन व संपादन केले. भन्तेजी स्थायी नागपूर मध्ये असत परंतु ते सतत भ्रमंती करत.

दिक्षाभूमी वर राहत असताना स्मारक समिती सोबत भन्तेजींचे संबंध बिघडले. जेव्हा संबंध जास्तच बिघडू लागले तेव्हा त्यांनी एक वेगळे स्वतंत्र विहार बनविण्यासंबंधी विचार केला. यासाठी जागेची शोधशोध सुरु झाली. कामठीचे वामनराव डांगे एके दिवशी भन्तेजींना कामठी छावनी येथे दादाभाई झाल यांना भेटावयास घेऊन गेले. ८.३० एकर जागा देणे त्यांनी मंजूर केले. नंतर त्या जागेचे नामकरण **'बुद्ध भूमि'** ठेवण्यात आले. सन १९७७ साली **'बौद्ध प्रशिक्षण संस्थान'** ची स्थापना केली गेली, भन्तेजी त्याचे अध्यक्ष होते.

५ जानेवारी १९८५ ला भन्तेजींचा ८० वा वाढदिवस होता. त्याचसमयी विहाराचे उद्घाटन करण्याचे निश्चित करण्यात आले. याकरिता पहिल्यापासूनच भन्तेजींनी परमपावन दलाई लामांची तारीख घेऊन ठेवली होती. ५ जानेवारी १९८५ ला ठरल्याप्रमाणे दलाई लामांच्या हस्ते विहाराचे उद्घाटन झाले. भन्तेजींचा ८० वा वाढदिवस जोरदारपणे संपन्न झाला.

त्यानंतर भन्तेजींचे वास्तव्य बुद्ध भूमिवरच राहिले. २२ जून १९८८ ला मेयो हॉस्पीटल मध्ये भन्तेजींचे महाप्रयाण झाले. त्यांच्या निधनाने शहरात दु:खाची लहर पसरली. त्यांचा अंतिम संस्कार बुद्धभूमीवरच करण्यात आला. त्यांचे निधन हिन्दी साहित्य जगत, बुद्ध धम्माचे वैचारिक जगत आणि समतावाद्यांच्या समतावादी जगातील न भरुन निघणारी हानी आहे.

(डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन जीवन दर्शन, संक्षिप्त)

मराठी अनुवाद - ***अरविंद भंडारे***

## पौर्णिमांचे महत्व

**चैत्र पौर्णिमा** - सुजाताची बोधिसत्व सिध्दार्थ गौतमास खीर दान.

**वैशाख / बुध्द पौर्णिमा** - बोधिसत्व सिध्दार्थ गौतमाचा जन्म, बुध्दांना ज्ञानप्राप्ती व बुध्दांचे महापरिनिब्बाण या तिन्ही मंगलमय घटना याच पौर्णिमेला घडल्या.

**ज्येष्ठ पौर्णिमा** - सुजातास धम्मदीक्षा, प्रथम उपासक तपस्सू व भल्लीक यांची धम्मदीक्षा.

## दिनविशेष

**१ एप्रिल** - भिक्खु धर्मरक्षित जयंती

**९ एप्रिल** - महापंडित राहुल सांकृत्यायन जयंती.

**११ एप्रिल** - महात्मा जोतिबा फुले जयंती.

**१४ एप्रिल** - बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**२२ एप्रिल** - जेम्स् प्रिन्सेप स्मृतिदिन

**२९ एप्रिल** - अनागरिक धम्मपाल स्मृतिदिन.

**६ मे** - शाहू महाराज स्मृतिदिन.

**८ मे** - रवींद्रनाथ टागोर जयंती.

**१२ मे** - प्रो. डॉ. टि. डब्ल्यू. व्हिस डेव्हिड जन्मदिन.

**२७ मे** - माता रमाई स्मृतिदिन.

**६ जुन** - महास्थविर गुरु चंद्रमणी जयंती.

**२२ जुन** - भदंन्त आनन्द कौसल्यायन स्मृतिदिन

**२६ जुन** - छत्रपति शाहु महाराज जयंती

# दक्षिण भारतातील प्रमुख बौद्ध स्थळ नागार्जुन कोंडा, सन्नती, अमरावती

*- अरविंद भंडारे*

भगवान बुद्धांनी आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू या दक्षिण भारतातल्या प्रदेशांतील मातीत कधीच प्रवेश केला नव्हता परंतु त्यांच्या धातूरक्षा, बौद्ध संस्कृती सम्राट अशोकांच्या काळात व त्यानंतरच्या बौद्ध राजांच्या काळात सर्वत्र पसरली होती व भरभराटीस आली होती. अशोक काळाच्या आधीच बुद्ध धम्माचा प्रवेश दक्षिण भारतात झाला होता. हे प्रो. के. आर. सुब्रमण्यम यांनी मोनोग्राफच्या आधारे सिद्ध केले आहे. आंध्र प्रदेशातील बौद्ध स्थळे व अवशेष हे अशोक पूर्वकालीन आहेत यात कोणतीही शंका नाही. येथील सापडलेले अवशेष हे बुद्धांचे रक्षाधातू असून ते अजून ही अस्तित्वात आहेत. त्यापैकी श्रीलंकेत पोहचलेला दंतधातू व मुंबईच्या ग्लोबल विपस्सना पॅगोडात स्थापित केलेले धातूरक्षा आहेत.

**नागार्जुन कोंडा** (नागार्जुन टेकडी) हे एक बौद्ध काळातील ऐतिहासिक नगर असून ते सध्या एक बेटाच्या स्वरुपात नागार्जुन सागर आंध्रप्रदेश जवळ राज्यातील नालगोंडा जिल्ह्यात वसलेले आहे. १९६० साली नागार्जुन सागर धरणाच्या बांधकामावेळी या ठिकाणाचा बराचसा भाग पाण्याखाली जाऊन ही टेकडी तेवढी शिल्लक राहिली. या टेकडीवरच आज या ठिकाणी प्राप्त झालेले बौद्ध अवशेष ठेवण्यात आले आहेत. भारतातील सर्वात समृद्ध बौद्ध स्थळांपैकी नागार्जुनकोंडा हे स्थळ आहे ज्याला प्राचीन काळात श्रीपर्वत म्हणून ओळखले जात. सध्या हे ठिकाण पूर्णपणे नागार्जुन सागर धरणाच्या पाण्याखाली विसावले आहे. या स्थळाचे नाव महान आचार्य नागार्जुन यांच्या नावावरुन पडले आहे. ज्यांचे या ठिकाणी इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात वास्तव्य होते. आचार्य नागार्जुन हे महायान पंथातील बौद्ध विद्वान, तत्वज्ञानी होते. ज्यांनी महायान सूत्रांची रचना केली. आचार्य नागार्जुनांना रसायनशास्त्राचे जनक व आयुर्वेदाचार्य देखील म्हटले जाते. त्यांनी माध्यमिक शाखेची निर्मिती केली. या भागात प्राचीन काळात पुष्कळशी बौद्ध विद्यापीठे होती ज्यांत चीन, बंगाल, जपान व लंका इत्यादी देशातून विद्यार्थी विद्याजर्नासाठी येत.

३ऱ्या व ४ थ्या शतकांत नागार्जुन कोंडा इश्वाकू राज्यकर्त्यांच्या राजधानीचे शहर होते जे हैद्राबाद पासून १५० किमी. अंतरावर होते. येथील प्राचीन स्थळांचा बराचसा भाग कृष्णा नदीच्या खोऱ्यात येतो. येथे बरेचसे बौद्ध संघाराम व वेगवेगळ्या पंथातील बौद्ध दैवत आपणांस पहावयास मिळतात. १९६० साली कृष्णा नदीवर बांधण्यात आलेल्या धरणामुळे बराच उत्खननीत भाग कृष्णा नदीच्या पाण्याखाली आहे. त्यातील काही शिल्प संवर्धित करुन ती बेटावर ठेवण्यात आली आहेत तीच आपण आज पाहू शकतो.

नागार्जुनकोंडा हे भारतातील प्राचीन बौद्ध स्थळांपैकी एक समृद्ध बौद्ध स्थळ आहे. नागार्जुनकोंडा एकेकाळी इश्वाकू राज्याची राजधानी होती तिला विजयपुरी या नावाने संबोधले जात होते.


इ.स. १९२७ आणि १९३१ साली नागार्जुनकोंडा येथे केलेल्या उत्खननात लॉगहार्स्ट यांना शिलालेखात उल्लेख केलेला महाचैत्य, दुसरे आठ स्तूप चार संघाराम, सहा बौद्ध मंदिरे, चार मोठे सभागृह आणि एक राजवाडा सापडला. प्रत्येक इमारतीच्या भोवती रेलिंग होते. शिवाय तेथे अनेक स्तंभ होते. नागार्जुनकोंडा येथील बौद्ध स्मारकांतून सहाशेपेक्षा जास्त शिल्पकलाकृती प्राप्त करुन त्या नागार्जुनसागराच्या मध्यभागी टेकडीवर उभारलेल्या वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत. त्या शिल्पकलाकृतीत भगवान बुद्धांच्या जीवनातील प्रसंग आणि काही जातक कथा कोरलेल्या आहेत. तेथे भगवान बुद्धांच्या मुर्त्यासोबतच महाचैत्यात सोन्याचे व चांदीचे कलश प्राप्त झाले आहेत. ज्यात भगवान बुद्धांच्या धातूरक्षा ठेवण्यात आल्या होत्या. येथे सापडलेल्या शिलालेखातून राजघराण्यातील कमीत कमी पंधरा महिलांनी दान दिल्याचे उल्लेख आहेत त्या महिलांनी आपण बौद्ध असल्याचे अभिमानाने सांगितलेले आहे हे विशेष आहे.

**अमरावती :-**


कृष्णा नदीच्या दक्षिण खोऱ्यात वसलेले अमरावती हे शहर आंध्रप्रदेशातील २ऱ्या व ३ ऱ्या शतकातील प्रसिद्ध बौद्ध शिक्षण केंद्र म्हणून प्रसिद्धी पावले होते. सम्राट अशोकांच्या काळात येथे महास्तूपाची निर्मीती करण्यात आली होती. आज अमरावती येथे प्राप्त झालेले बरेच बौद्ध शिल्प हे मद्रास येथील प्राचीन वस्तू संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत. अमरावती येथील स्थळाला देण्यात आलेल्या दानाचे उल्लेख तेथील प्राप्त वस्तूंवर कोरण्यात आले आहेत. प्राप्त शिलालेखांतून सिंहवर्मन नावाच्या पल्लव राजाने व बाराव्या तेराव्या शतकात धान्यकटक येथे राज्य करणाऱ्या राजाने महाचैत्याला दानदिल्याचे उल्लेख आहेत.


इ.स.वी सन १३४४ सालच्या एका शिलालेखात धर्मकिर्ती नावाच्या श्रीलंकेच्या प्रवाशाने महाचैत्याची डागडुजी केल्याची नोंद आहे. यावरुन हे सिद्ध होते की अमरावती येथे १५०० वर्षाहून अधिक काळ बुद्ध धम्म उर्जितावस्थेत होता.


सन्नती (कलगनहल्ली) सन्नती हे गाव भीमा नदीच्या काठावर चितापुर तालुक्यात गुलबर्गा जिल्ह्यात स्थित कर्नाटक राज्यात आहे. येथेच नजीक ३ ३ किमीवर कनगनहल्ली हे प्राचीन बौद्ध स्थळ आहे. असे म्हटले जाते की याच ठिकाणी सम्राट अशोकांनी आपले शेवटचे दिवस आपल्या नातेवाईकांसह व्यतित केले होते. येथे सम्राट अशोकांचे चार शिलालेख प्राप्त झाले असून त्यावर पालि भाषा व ब्राह्मी लिपीतील लेख आहेत. येथे एका महास्तूपासोबत अनेक शिल्प व विहारांचे भग्नावशेष देखील सापडले आहेत. सातवाहनांच्या काळातील हे दक्षिण भारतातील प्रमुख बौद्ध स्थळांपैकी एक स्थळ आहे.


कलगनहल्ली


कलगनहल्ली


नागार्जुनकोंडा


नागार्जुनकोंडा


अमरावती

# धर्मांतरित बौद्ध या समूहाला धर्मांतरित बौद्ध म्हणून महार न लिहता केंद्राचे आरक्षण मिळाले पाहिजे.

*- अनिल वैद्य,* माजी न्यायाधिश
मोबा. - ९६५७७५८५५५

२०२१ च्या जनगणेत बौद्धांनी काय लिहावे यासाठी अनेक सभा, मुलाखती, लेख इत्यादी मार्गदर्शन बौद्ध नेते करीत आहेत. बौद्ध असूनही महार लिहा म्हणून सांगितल्या जात आहे.

यात त्यांना मी दोष देत नाही कारण १९९० च्या कायद्यानुसार तसे लिहले तरच अनुसूचित जाती मध्ये गणना होते पण केवळ जनगणना आली की ते महार लिहा असे आवाहन करतात. यातून मार्ग काढण्यासाठी मात्र दहा वर्षे काहीच करीत नाहीत याचा खेद होतो.

अनुसूचित जातीच्या सवलती कुणाला मिळतात तर जी जात किंवा त्या जातीचा भाग किंवा गट अनुसूचित जातीच्या सूचित असतो त्यांनाच आरक्षण मिळते, अनुसूचित जातीची संविधानाच्या कलम ३६६ (२४) मध्ये व्याख्या आहे. महार हे महाराष्ट्र राज्यासाठी असलेल्या सुचित क्रम ३७ ला आहे.

धर्मांतरित बौद्ध हे मात्र अनुसूचित नाही म्हणुन बौद्धांना अनुसूचित जाती म्हणून गणना करता येत नाही असे जनगणना आयोगाने लेखी कळविले आहे. अट्रोसिटी ऍक्ट असो की कोणत्याही ठिकाणी आरक्षण हा मुद्दा आला तर अनुसूचित जातीची व्याख्या कलम ३६६ (२४) पूर्ण करणाऱ्यांना अनुसूचित जातीचे समजले जाते.

या सूचित समाविष्ट करण्यासाठी संविधान कलम ३४१ नुसार जात किंवा जातीचा गट किंवा भाग यांचाही समावेश केला जातो. धर्मांतरित बौद्ध हा अनुसूचित जातीचा भाग आहे विशेषत: महाराष्ट्र राज्यात महार जातीच्या लोकांचा धर्मांतर केलेला गट आहे.

या पूर्वीच्या अनुसूचित जातीच्या गटाला किंवा वर्गाला बौद्ध (अनुसूचित जातीतून धर्मांतरीत) असे नाव देऊन अनुसूचित समाविष्ट केले तर महार न लिहता आरक्षण मिळेल.

बौद्ध (अनुसूचित जातीतून धर्मांतरित) ही जात नाही किंवा धर्म नाही तर तो पूर्वीच्या महार जातीचा भाग आहे या गटाला संविधान अनुसूचित जाती आदेश १९५० च्या सूचित सामाविष्ट केले तरच ही समस्या सुटू शकते अन्यथा महार लिहणे भाग पडते. अनुसूचित जाती जमाती या लोक समुह असतात. त्या निव्वळ जाती नसतात.

**धर्मांतरित बौद्ध**

हा वर्ग आहे, हा धर्म नाही, जात सुद्धा नाही, हा लोकसमूह आहे, जो संविधान अनुच्छेद १६ (४) नुसार आरक्षणास पात्र आहे. बी.डी. देशमुख समितीने अनुसूचित जाती व धर्मांतरित बौद्ध हा वर्ग सुचविला तो १९६५ ला महाराष्ट्र सरकारने स्वीकारला व धर्मांतरित बौद्धांना आरक्षण दिले.

महाराष्ट्र सरकारने दिलेल्या बौद्धांच्या आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात एका गोपालकृष्ण चव्हाण नावाच्या अर्जदाराने आव्हान दिले व ते रद्द करा अशी मागणी केली असता मा. मुंबई उच्च न्यायालयाने गोपाळकृष्ण चव्हाण विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात खालील मत व्यक्त केले की त्या जाती नसून तो मागासलेला समूह आहे ज्यांना सामाजिक अनुकम्पेची गरज आहे.

सरकारच्या निर्णयात सामाजिक अनुकंपा दिसून येते. धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जाती सोबत सवलती देणे हा शासनाचा अचूक निर्णय आहे.

(AIR 1987 Bom 123 para 67) या निर्णयात मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की न्यायसंस्था अनुसूचित जाती जमातीला ते जाती नाही तर मागासलेला समूह समजतात. असे म्हणून त्यांनी धर्मांतरित बौद्ध या गटाला किंवा समूहाला महाराष्ट्र सरकारने दिलेले आरक्षण योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. पण केंद्र सरकारच्या सूचित हा वर्ग नाही म्हणून केंद्र सरकार बौद्ध म्हणून आरक्षण देत नाही तर महार म्हणून देते. सूचित समाविष्ट करण्याचे अधिकार फक्त केंद्र सरकारला आहेत परंतु राज्य सरकारने शिफारस करणे गरजेचे आहे, राज्य सरकारने अनेकदा निवेदने देऊन सुद्धा केंद्र सरकारला शिफारस केली नाही. त्यामुळे हा अस्मितेचा प्रश्न तसाच कायम आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार जात व हिंदू धर्म १४ ऑक्टोबर १९५६ ला सोडला तरी आरक्षण मिळण्यासाठी महार जातीचा असल्याचा उल्लेख करावा लागतो ही परिस्थिती बदलली पाहिजे. बौद्धांना महार न लिहता आरक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी सरकारने कायद्यात दुरुस्ती करावी. बौद्धांनी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन आपल्या आत्मसन्मानाचा हक्क मिळवून घेतला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १ जून १९३६ ला मुंबई येथे मुंबई महार इलाखा परिषदेत म्हणाले, "तुम्हाला जी जातीवाचक नावे प्राप्त झालेली आहेत त्या नावांना इतकी दुर्गंधी लागलेली

आहे की, त्याचा उच्चार केला असताना देखील स्पृश्य लोकांना मळमळून येते आणि म्हणूनच तुम्ही स्वत:ला महार न म्हणता, चोखामेळा म्हणून लोकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करता ! परंतु त्याने लोक फसत नाहीत याचाही तुम्हाला अनुभव आहेच कारण चोखामेळा म्हटले काय किंवा हरिजन म्हटले काय लोक जे समजायचे ते समजतील तुम्हाला नामांतराची आवश्यकता भासते हे तुमच्या वर्तणुकीनेच तुम्ही सिद्ध केले आहे. मला तुम्हाला एवढेच विचारावयाचे आहे की नामांतर करणे हे जर तुम्हाला अवश्य वाटते तर मग तुम्हाला धर्मांतर करण्यास काय हरकत असावी ? धर्मांतरित हे एका दृष्टीने नामांतरित आहे. धर्मांतराने होणारे नामांतर हे तुम्हाला जास्त फायदेशीर पडेल. मुसलमान म्हणवून घेणे, खिस्ती म्हणवून घेणे, बुद्ध म्हणवून घेणे, शीख म्हणवून घेणे हे धर्मांतर आहेच पण नामांतरही आहे ते खरे नामांतर या नामांतराला दुर्गंधी नाही हे नामांतर आमूलाग्र आहे शोध कोणी करु शकणार नाही. परंतु चोखामेळा हरिजन या असल्या नामातरांपासून काही अर्थ नाही जुन्या नावाची घाण नव्या नावाला लागल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत तुम्ही हिंदू धर्मात राहाल तोवर तुम्हाला नामांतर करावेच लागेल. कारण नुसते हिंदू म्हणवून चालणार नाही. हिंदू हा कोणी मनुष्यप्राणी आहे असे कोणीच ओळखीत नाही महार असे सांगून भागणार नाही. कारण त्या नावाचा उच्चार केल्याबरोबर कोणी जवळ येणार नाही अशा मधल्या स्थितीत घोटाळत राहण्यापेक्षा हे नाव उद्या ते नाव असे नामांतर करीत बसण्यापेक्षा धर्मांतर करुन कायमचे नामांतर तुम्ही का करु नये, असा तुम्हाला माझा प्रश्न आहे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण व लेखन खंड १८ (१) पान ११०, १११)

१४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माचा स्वीकार केला परन्तु त्या समाजाची सामाजिक, शैक्षणिक परिस्थिती मागासलेली आहे त्यांना महाराष्ट्र सरकार बौद्ध म्हणूनच अनुसूचित जातीचे आरक्षण देत आहे परन्तु केंद्र सरकार मात्र महार असल्याचे नमूद केल्या शिवाय आरक्षण देत नाही. यात बदल झाला पाहिजे त्यासाठी कायदयात असलेल्या तरतुदीनुसार बदल करुन धर्मांतरित बौद्धांना आरक्षण दिले तर त्यांच्या प्रतिष्ठेचे जतन होईल.

१९२१ ते १९३१ या काळात पंजाब राज्यातील चांभार व काही अस्पृश्य जातींनी आदिधर्म स्वीकारला होता. हा आर्य समाज धर्म याचा एक भाग आहे. १९३० ला या धर्मांतरित लोकांनी सरकारला अर्ज केला की आम्ही हिंदू नाही आम्ही आदिधर्म स्वीकारला आमची आदिधर्मी म्हणूनच जनगणेत नोंद व्हावी. त्या प्रमाणे जनगणना करताना त्यांची नोंद चमार अशी केली नाही तर आदिधर्मी अशी केली. पुढे त्यांना अनुसूचित जाती चे आरक्षण सुद्धा आदिधर्मी या नावानेच दिले. संविधान अनुसूचित जाती आदेश १९५० च्या पंजाब राज्याच्या सुचित आदिधर्मी नावानेच दिले. संविधान अनुसूचित जाती आदेश १९५० च्या पंजाब राज्याच्या सुचित आदिधर्मी चा समावेश नं. १ ला आहे.

धर्मांतरीत लोकांना जुने आरक्षण मिळेल ही बाब स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आदिधर्मी लोकांचे उदाहरणे टाईम्स ऑफ इंडिया च्या पत्रकाराला सांगितले होते. (पहा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण खंड १७ भाग पान २४२-२४३)

**स्वाभिमानी रोहिदास पंथ समूह:**

समतेसाठी भजन कीर्तनातून चळवळ करणारे प्रसंगी मनुवाद्यांसोबत संघर्ष करणारे अनेक संत होऊन गेले, त्यापैकी संत रविदास हे एक आहेत.

उत्तर प्रदेशात वाराणसी येथे त्यांचा जन्म झाला. जन्म वर्ष निश्चित नाही पण इ.स. १३७७ हे वर्ष सांगितले जाते. उत्तरप्रदेश, पंजाब, महाराष्ट्र इत्यादी राज्यात सुमारे इस. १४०० ते १५४० च्या दरम्यान त्यांचा कार्यकाळ होता असे सांगतात. ते जातीने चर्मकार होते. त्यांनाही जातीयवाद सहन करावा लागला. ते कीर्तन व भजनद्वारे जातीयवादी प्रवृत्ती विरुद्ध सतत संघर्ष करीत असायचे. प्रसिद्ध संत मीराबाई सुद्धा त्यांच्या भक्त होत्या, मुघल राजा बाबर सुद्धा त्यांना वंदन करायचा, बाबराने केलेल्या काही सुधारणा संत रविदास यांच्या उपदेशाने केल्या असे बोलले जाते.

रविदास यांना रोहिदास किंवा रैदास सुद्धा म्हणतात. त्यांच्या अनुयायांना रोहिदास पंथी म्हणतात. चर्मकार व अस्पृश्य अशा जातींना चमार किंवा चर्मकार या नावाने वर्णव्यवस्थेत कमी लेखल्या जायचे म्हणून त्यांनी रोहिदास हा पंथ स्विकारला व जुन्या जातीचा उल्लेख करणे सोडून दिले. महाराष्ट्र राज्यात सुद्धा रोहिदास पंथी समूह मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनी चमार किंवा अन्य अस्पृश्य जाती नावा ऐवजी रोहिदास नावानेच अनुसूचित जाती चे आरक्षण मिळावे अशी मागणी केली व ती केंद्र सरकारने २००७ ला पूर्ण केली. संविधान अनुसूचित जाती आदेश दुरुस्ती २००७ मंजूर करुन त्याचे ३० एप्रिल, २००७ ला गॅझेट प्रकाशित केले व महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या सूचित

नं. ११ ला रोहिदास या गटाला समाविष्ट केले (ॲक्ट ३१/ २००७)

आत्मसन्मान कळलेल्या स्वाभिमानी रोहिदास पंथी समाजाचे उशिराने का होईना अभिनंदन केल्या शिवाय राहवत नाही. बौद्धांना हे उदाहरण पुरेसे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला आपल्या लाखों अस्पृश्य महार बांधव हिंदू धर्म व महार जातीतून बाहेर पडले. ते बौद्ध झाले. त्या नंतर स्वाभिमानाने बौद्ध बांधव आपली नोंद बौद्ध म्हणून करु लागले. गेल्या ६७ वर्षात स्वाभिमान इतका प्रखर झाला की बौद्धांना महार म्हणून नोंदविणे अपमानास्पद वाटत आहे. कुणी त्यांना महार म्हटलेले सुद्धा आवडत नाही. ॲट्रोसिटी करतात.

बौद्धांना बौद्ध म्हणुन आरक्षण देण्यासाठी व त्यांच्या भावना जपण्यासाठी १९५७ ला महाराष्ट्र सरकारने धर्मांतरित बौद्धांना ओबीसी चे आरक्षण दिले. Scheduled caste converted to Buddhism असा प्रवर्ग ओबीसी सूचित दि. १७-१-१९५८ नुसार दाखल केला होता. त्यानंतर दि. ६ जुलै १९६० च्या परीपत्रकानुसार धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातींच्या सवलती लागू केल्या (Resolution No SCW 2260 Dated 6th July 1960)

त्यानुसार धर्मांतरित बौद्ध म्हणूनच अनुसूचित जातीचा वेगळा दाखला ही दिला. त्या नंतर महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाबाबत बी. डी. देशमुख व इतर ६ मान्यवरांची समिती राज्य सरकारने गठीत केली त्यात रिपब्लिकन नेते आर. डी. भंडारे हे सदस्य होते. या समितीने Scheduled caste and Nav Buddhas अर्थात अनुसूचित जाती व नवबौद्ध अशा प्रवर्गाला १३ टक्के आरक्षण सुचविले. सरकारने ते १९६५ च्या परिपत्रकानुसार लागू केले. या आरक्षणाला मुंबई उच्चन्यायालयात एक उच्चवर्णीय व्यक्तीने ते रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली असता मुंबई उच्च न्यालयालयाच्या तीन न्यायमूर्तीच्या खंडपीठाने ती याचिका फेटाळून लावली व राज्य सरकारचा निर्णय योग्य असल्याचे मत व्यक्त केले (संदर्भ:- गोपालकृष्ण चव्हाण विरुद्ध राज्य निर्णय दि. १४ जानेवारी १९८६)

केंद्र सरकारने ३० ऑक्टोबर १९७१ ला धर्मांतरित बौद्धांना शिष्यवृत्ती लागू केली. मंडळ आयोगाने नव बौद्ध या प्रवर्गाला ओबीसी आरक्षण देण्यासाठी शिफारस केली होती. तर १९९० ला केंद्र सरकारने बौद्धांना अनुसूचित जातीच्या सवलती लागू केल्या. राज्य सरकारच्या अनेक परिपत्रकात अनुसूचित जाती व धर्मांतरित बौद्ध असा उलल्ेख असतो.

महाराष्ट्र सरकाने धर्मांतरित बौद्धांना जुनी महार जात लिहणे टाळून दाखला देण्यासाठी व्यवस्था केली परंतु हा प्रवर्ग किंवा गट कोणत्याही सूचित नाही. मंडळ आयोगाने शिफारस केल्यावरुन महाराष्ट्र राज्यातील इतर मागास जाती ओबीसी च्या सूचित धर्मांतरित वर्गाचा समावेश केला आहे ते बघून ओबीसी सूचित नं. १९६ ला अनुसूचित जातीतून खिश्चन धर्म स्वीकारले.

हा १९६ ला एक वर्ग आहे न. १८७ भटीयारा (मुस्लिम धर्मीय) ३४१ ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन खिश्चन, ईस्ट इंडियन कॅथोलिक या शिवाय विशेष मागास प्रवर्ग (SBC) मध्ये नं. ७ ला मुस्लिम धर्मीय वर्गाला आरक्षण आहे.

जर अनुसूचित जातीतून खिश्चन धर्म स्वीकारलेले किंवा ईस्ट इंडियन खिश्चन या नावाने ओबीसी च्या सूचित हे वर्ग आहेत तर बौद्ध (अनुसूचित जातीतून धर्मांतर) या प्रवर्गाला केंद्राच्या अनुसूचित का दाखल करता येत नाही ? ही जात नसून वर्ग आहे, एक गट आहे, १९९० च्या विधेयकाच्या प्रस्थावनेत सुद्धा गट म्हटले आहे. संविधान अनुच्छेद ३४१ नुसार एखाद्या जातीला किंवा वर्गाला अनुसूचित समाविष्ट करता येते. अनुच्छेद ३४१ नीट व सूक्ष्म वाचला पाहिजे.

ही मागणी धार्मिक आधारांवर धर्म म्हणून किंवा जात म्हणून सूचित समाविष्ट करण्याची मागणी नाही तर ते पूर्वी चे अनुसूचित जातीच्या अस्पृश्य जातीतील महार होते त्यांनी धर्म बदलविला परंतु त्यांची सामाजिक, शैक्षणिक परिस्थिती मागास आहे व त्यांचे सरकारी नोकरीत प्रमाण कमी आहे म्हणूनच महाराष्ट्र सरकार १९६० व १९६५ पासून आरक्षण देत आहे. या आधारे ही मागणी आहे.

महाराष्ट्रात धर्मातरित बौद्ध हे पूर्वाश्रमीच्या अनुसूचित महार जातीचे आहेत ज्यांना आरक्षण लागू होते त्या जातीला केंद्र सरकारचे आरक्षण लागू आहे. ते धर्मांतरानंतर बौद्ध म्हणून पूर्ववत लागू व्हावे कारण तो अद्यापही सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागास असून त्यांचे सरकारी नोकरीत प्रमाण पुरेशे नाही ते संविधान अनुच्छेद १६ (४) चे निकष पूर्ण करतात. हा अनुसूचित जातीचा मागणीचा आधार असून धर्म हा आधार नाही. धर्माच्या आधारावर बौद्धांची आरक्षणाची मागणी नाही तर ते पूर्वीच्या अनुसूचित महार जातीचे होते त्यांना जुन्या जातीच्या नावाने आरक्षण देण्याऐवजी बौद्ध (अनुसूचित जातीतून धर्मांतरित) हा वर्ग म्हणून द्यावे, फक्त नावात बदल करावयाचा आहे बाकी निकष कायम आहेत.

बौद्ध धम्मात जात नसते तरीही आरक्षणासाठी धर्म बौद्ध व जात महार लिहणे भाग पडले ही बाब धर्मस्वातंत्र्या विरुद्ध आहे.

धर्मांतरित बौद्धांच्या धर्म स्वातंत्र्याचे जतन व्हावे ही अगदी साधी मागणी आहे. जसे की धर्मांतरित खिश्चन किंवा ईस्ट इंडियन खिश्चन यांना त्या नावाने ओबीसीचे आरक्षण दिल्या जात आहे.

संविधानाच्या अनुच्छेद ३४१ नुसार संसद एखादया जातीला किंवा त्याच्या वर्गाला / गटाला caste or its group अनुसूचित समाविष्ट करु शकते तसे कलम ३४१ मध्येच नमूद केलेले आहे. म्हणूनच बौद्धांना बौद्ध म्हणूनच महाराष्ट्र सरकारने १९६० पासून सवलत दिली आहे. १९९० पासून बौद्धांना केंद्र सरकारने सुद्धा आरक्षण लागू केले.

केंद्र सरकारचे धर्मांतरित बौद्धांना ऑलरेडी आरक्षण लागू आहे तो समुह बौद्ध (अनुसूचति जातीतून धर्मांतरित) म्हणून अनुसूचित समाविष्ट करावा म्हणजे महार न लिहता अनुसूचित जातीच्या आरक्षणास पात्रता मिळेल. बौद्धांना बौद्ध म्हणून अनुसूचित जातीचे आरक्षण मिळत नाही म्हणून आरक्षण नको म्हणतात. तर काही मित्र अल्पसंख्याक आरक्षण घ्या म्हणतात खरे तर संविधानाच्या कलम १६ (४) नुसार शैक्षणिक व नोकरीत आरक्षण नाही. तसेच बौद्धांना बौद्ध म्हणूनच आरक्षण मिळावे यासाठी काहीही न करता व महार लिहा, मातंग लिहा असे ढोल पिटणे सुद्धा व्यवस्थेत **'जैसे थे'** वादी मानसिकता आहे. यात सुधारणा करण्याचा विचार सुद्धा करीत नाहीत किंवा या व्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी ही मानसिकता काहीच करीत नाहीत. त्यांनी आता तरी परिवर्तनासाठी लक्ष दयावे या शुद्ध हेतूने हा लेख प्रस्तुत केला आहे.

१९९० ला व्हि. पी. सिंग प्रधानमंत्री असताना बौद्धांना अनुसूचित जातीच्या सवलतीचा कायदा केला परन्तु बौद्धांना महार जातीचा दाखला दिल्याशिवाय आरक्षण मिळत नाही. केंद्र सरकारच्या नोकऱ्यांसाठी महार जातीचाच दाखला चालतो. महाराष्ट्र सरकारचा धर्मांतरित बौद्ध म्हणून असलेला दाखला स्वीकारल्या जात नाही. त्यामुळे बौद्ध विद्यार्थ्यांची कुचंबणा होत आहे. महार लिहण्याची नौबत का आली ? याचा विचार केला पाहिजे, या नौबतीला आमचा नाकर्तेपणा जबाबदार आहे. गेली १५ वर्षे समता सैनिक दलाचे कार्यवाह प्रदीप गायकवाड व त्यांचे सहकारी बौद्धांची जनगणनेत अनुसचित जाती म्हणून नोंद व्हावी म्हणजे जनगणना आयोगाला मागणी करतात तर जनगणना आयोगाचे उत्तर येतात की, बौद्ध हे अनुसूचित नाहीत केंद्र सरकारच्या नोकरीत सुद्धा जाती प्रमाणपत्रावर महार लिहलेले नसेल तर अनुसूचित जातीचे आरक्षण दिल्या जात नाही कारण महार ही जात अनुसूचित आहे.

बौद्ध अनुसूचित नसल्याने जर महार लिहिण्याची नामुष्की आली असेल तर सरकारने धर्मांतरित बौद्ध म्हणून अनुसूचित का दाखल करु नये ? भारतीय संविधानाच्या कलम ३४१ नुसार एखाद्या जातीला किंवा जातीच्या गटाला केंद्र सरकार अनुसूचित समाविष्ट करु शकते.

**कलम :- ३६६ (२४)**

अनुसूचित जाती म्हणजे या घटनेच्या उद्देशाने कलम ३४१ अन्वये मानल्या गेलेल्या अशा जाती, वंश किंवा जमातीमधील अशी प्रकरणे, वंश किंवा जमाती किंवा भागातील किंवा गटातील भाग.

Constitution Article 366(24) "Scheduled Castes" means such castes, races or tribes or parts of or groups within such castes, races or tribes as are deemed under article 341 to be Scheduled Castes for the purposes of this Constitution; Buddhist (converted from scheduled caste) हा समुह एक वर्ग आहे, ही जात नाही, हा धर्म नाही, हा लोकसमूह आहे, जो संविधान अनुच्छेद १६ (४) नुसार आरक्षणास पात्र आहे बी.डी. देशमुख समितीने अनुसूचित जाती व धर्मातरित बौद्ध हा वर्ग सुचविला तो १९६५ ला महाराष्ट्र सरकारने स्वीकारला व धर्मांतरित बौद्धांना आरक्षण दिले. महाराष्ट्र सरकारने दिलेल्या बौद्धांच्या आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात एका गोपालकृष्ण चव्हाण नावाच्या अर्जदाराने आव्हान दिले व ते रद्द करा अशी मागणी केली असता मा. मुंबई उच्च न्यायालयाने गोपालकृष्ण चव्हाण विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात खालील मत व्यक्त केले.

The discerning sense of the Indian Corpus Juris Juris has generally regarded Scheduled Castes and Scheduled Tribes not as castes but as a large backward group deserving of societal compossion. It is this "societal compassion that prevailed in Gevernment's decision in rightly clubbing the Buddhist Converts with their genus, viz. the Scheduled Castes.

न्यायसंस्थेचे अनुसूचित जाती जमाती बाबत विवेकी मत असे आहे की त्या जाती नसून तो मागासलेला समूह आहे ज्यांना सामाजिक अनुकंम्पेची गरज आहे. सरकारच्या निर्णयात सामाजिक अनुकंपा दिसून येते. धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जाती सोबत सवलती देणे हा शासनाचा अचूक निर्णय आहे. या निर्णयात मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायसंस्था अनुसूचित जाती

जमातीला ते जाती नाही तर मागासलेला समूह समजतात. असे म्हणून त्यांनी धर्मांतरित बौद्ध या गटाला किंवा समूहाला महाराष्ट्र सरकारने दिलेले आरक्षण योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र सरकार जर बौद्धांना धर्मांतरित बौद्ध म्हणून आरक्षण देऊ शकते तर केंद्र सरकार का देऊ शकत नाही ? अनुसूचित जातीच्या सवलतीचे अधिकार संविधानाच्या कलम ३४१ नुसार केंद्र सरकारला आहे. यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला शिफारस करायची आहे. त्यावरुन केंद्र सरकार अनुसूचित समावेश करीत असतो. १९५० नंतर अनेकदा अनुसूचित अनेक जाती किंवा वर्गांना केंद्र सरकारने समाविष्ट केले आहे. राज्य सरकारच्या शिफारशीला केंद्राने नकार दिल्याचे उदाहरण नाही. होऊ शकते पण आत्मविश्वास हवा. अस्मिता म्हणजे काय हे तरी कळावे.

# बोधगयेच्या पवित्र भुमिवरील अखिल भारतीय भिक्खु संघाच्या विद्यमान विहारास दानाचे आवाहन...

- *शांतारामजी इंगळे,* मलकापूर

चार बौद्ध धम्मस्थळांपैकी महत्वपुर्ण असलेले एक धम्मस्थळ बोधगया आहे. इथे तथागतांनी बुद्धत्व प्राप्त केले, सम्बोधी प्राप्त केली. म्हणून बोधगया विश्वातील श्रद्धावान अनुयायांकरीता अती महत्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळे ह्या पवित्र स्थळांवरील महाबोधी विहार, महाबोधी वृक्ष, वज्रासन पुजनीय वंदनीय आहेत. त्याकरीता ह्या वंदनीय स्थळांवर जगामधील अनेक बौद्ध राष्ट्रांमधील लोकांनी जागा खरेदी करुण आपापल्या सोयीसाठी प्रशस्त संघाराम व विहार बनविले आहेत, बनवित आहेत. हे बुद्ध अनुयायी ह्या पवित्र भुमीवर काही दिवस, महीने, वर्ष राहून धम्माची पवित्र अनुभुती घेवुन मनुष्य जिवन सफल झाल्याचे अनुभव घेत आहेत.

चिन, जपान, थाईलँड, बर्मा (म्यांमार), भुटान, बांग्लादेश, कंबोडीया, तिबेट यांसह अनेक बौद्ध राष्ट्रातील लोकांनी ह्या पवित्र भुमीचे दर्शन घेण्याची, राहण्याची, सुविधा आपापल्या लोकांसाठी निर्माण केली आहे. भिक्खु, भिक्खुनी, उपासक, उपासिका यांच्या आयुष्यातील सर्वात मोठ्यात मोठा आनंद, सुख, प्रसन्नता देणारा प्रसंग म्हणजे ह्या पवित्र भुमीवर नतमस्तक होणे. बोधगयेच्या पवित्र महाबोधी विहाराच्या पावन पवित्र भुमीवर डोके टेकवण्यातुन मिळणारी अपार प्रसन्नता समाधानाची तुलना नाही. ह्या बाबी बोधगया येथे जावून अनुभव घेणारेच जाणु शकतात.

अशा ह्या अतुलनीय पवित्र स्थळांवर आपल्या महाराष्ट्रातुन हजारो लोक जातात. पु. भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी १९९५ मध्ये महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन सुरुवात करुन प्रत्येक वर्षी बुद्ध पौर्णिमेनिमित्त बोधगया येथे धम्मसम्मेलनात महाराष्ट्रातील लोकांना एकत्र करण्याचे कार्य केले त्या दरम्यान दिल्ली, पटना सह अनेक ठिकाणी बोधगया मुक्ती बाबत आंदोलने केलीत त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेस बोधगया, सारनाथ, कुशीनगर, लुम्बीनी सह अनेक धम्मस्थळांचा परिचय झाला दर्शनाची अनुभूती झाली.

आम्ही स्वत: पंचवीस वर्षापासून बोधगया ह्या पवीत्र स्थळांना भेट देत आहेत. सुरुवातीस आपल्या महाराष्ट्रीयन लोकांना कुणी रहायला जागा देत नव्हते, रुम देत नव्हते, कुणीही सहकार्य करीत नव्हते फक्त तिबेटच्या मालकीचे कालचक्र मैदानावर सभा घेणे आणि त्याच मैदानात उघड्यावर राहणे, झोपणे, स्वयंपाक करणे, ह्या बाबी होत्या महाराष्ट्रातील खेड्या पाड्यातील काही शहरांमधील बौद्ध जनता अशाही विपरीत परिस्थितीत जमीनीवर खाणे, पिणे, झोपणे यात धन्यता मानत होती कारण मनामध्ये अपार श्रद्धा व संकल्प होता बुद्धगया मुक्ती आणि पवित्र भुमीचे दर्शन, त्यामुळे बहुतांश लोक चांगले खाणे, चांगले पाणी, गादीवर झोपणे, आंघोळीचे पाणी ह्याची अपेक्षाही करीत नव्हते अशा ह्या विपरीत परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील जनतेस अखिल भारतिय भिक्खु संघाच्या प्रशस्त जागेत विहारात शक्य तितक्या लोकांना निवास, भोजन, शौचालय, बाथरुमची व्यवस्था देण्यात आली. हे एकमेव विहार महाराष्ट्रातील जनतेच्या हक्काचे म्हणुन भिक्खु, भिक्खुनी, उपासक उपासिका वापरत आलेत. पाच दहा वर्षाच्या दरम्यान परिस्थितीत सुधारणा झाली. अनेक लोक रुम घेऊन राहू लागले, काही लोक बुद्ध पौर्णिमा सोडून इतर वेळेतही बोधगयेला जाऊ लागले. हळुहळु वातावरण सकारात्मक व्हायला लागले. नंतर काही भिक्खुंनी बोधगया येथे जागा घेऊन विहार बांधण्याचा संकल्प केला. त्यात छोटे-मोठे एक दोन विहार निर्माण होत आहेत, झाले आहेत. परंतु महाराष्ट्रातील जनतेला विपरीत वातावरणात सहारा देणारे महाबोधी विहाराच्या जवळ असलेले सर्व दृष्टीने सोईचे असलेले आपले हक्काचे अ.भा. भिक्खु संघाचे विहार व संघाराम प्रशस्त असुनही दुर्लक्षीत झाले यात पु. भदन्त प्रग्यादिप विहाराचे मुख्य संचालक यांची मंगलकामना

*पुढील भाग पान क्र. २३ वर चालु....*

# बौद्ध धर्माच्या पुन: स्थापनेची आवश्यकता

*- गायकवाड जयकर बापुराव*
पालि विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**प्रस्तावना :-**

"**बौद्ध धर्माच्या पुन:स्थापनेची आवश्यकता**" हा विषय समजून घेण्यासाठी "**बौद्ध धर्माची पुन: स्थापना**" ही संकल्पना समजून घेणे महत्वाचे ठरते. बौद्धधर्माच्या पुन: स्थापनेच्या विषयाची सुरुवात आजच होत आहे असे मुळीच नाही. बौद्ध धर्माच्या इतिहासामध्ये बऱ्याचवेळा बौद्ध धर्माची पुन: स्थापना झाल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर बौद्ध धर्माने केलेल्या बौद्ध संगीती म्हणजे त्या-त्या काळातील बौद्ध धर्माच्या पुन: स्थापनाच होत्या असे म्हणता येईल. कारण बुद्धांच्या महापरिनिर्वाणा नंतर त्यांनी सांगितलेल्या वचनांना एकत्रित बांधण्यासाठी प्रथम संगीतीचे आयोजन करण्यात आले होते. पुन्हा त्यामध्ये काही विकृती झाल्याचे लक्षात येतात पुन्हा दुसरी बौद्ध संगीती बोलवण्यात आली होती. अशा पाच बौद्ध संगीती झाल्याचे संदर्भ सापडतात आणि या प्रत्येक बौद्ध संगीतीच्यावेळी यांच्या संगायनामध्ये काहीना काहीतरी बदल करण्यात आलेले दिसून येतात. याचा अर्थ या बौद्ध संगीतीमध्ये बौद्ध धर्मातील काही विकृतींना सुधारण्यासाठी त्या-त्या वेळी बौद्ध साहित्यातील काही भागांमध्ये बदल केले जात होते. म्हणजेच बौद्ध धर्माच्या साहित्याची पुनर्बांधणी करण्यात येत होती. याचा अर्थ होतो की बौद्ध धर्मातील विकृतींना सुधारण्यासाठी बौद्ध साहित्यातील विकृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात होता. म्हणजे साहित्यात बदल केले जात होते. तसेच आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा धर्माचा सांगोपांग अभ्यास करुन व इतर देशातील बौद्ध धर्माची अवस्था पाहून २४ जानेवारी १९५४ रोजी मुंबई येथील झेवियर कॉलेजच्या मैदानावर "**खऱ्या धर्माची पुन:स्थापना करण्याचे बिकट कार्य भावी पिढीवर येऊन पडले आहे**" असे प्रतिपादन केले होते. एवढेच नाही तर त्यांनी १९५६ मध्ये धर्मांतर करताना जसाच्या तसा बौद्ध धर्म न स्वीकारता त्यामध्ये २२ प्रतिज्ञांची जोड दिली आणि बौद्ध धर्माच्या पुन:स्थापनेचे संकेत दिले. यावरुन बौद्ध धर्माची पुन:स्थापना, पुर्नगठन, पुनर्बांधणी याविषयीची संकल्पना स्पष्ट होते. सदरील लेखामध्ये या विषयाचे विश्लेषण करण्यासाठी बुद्धांना अपेक्षीत धर्म कोणता, बौद्ध धर्मामध्ये झालेली विकृती कोणती, बौद्ध धर्मातील विकृतीला जबाबदार घटक कोणते आणि बौद्ध धर्माच्या पुन:स्थापनेची आवश्यकता का आहे. या प्रमुख मुद्द्यावर चर्चा केली गेली आहे.

**बुद्धांना अपेक्षित धर्म :-**

बुद्धांनी सांगितलेला सद्धम्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या "The Buddha and His Dhamma" या ग्रंथामध्ये स्पष्ट केला आहे.

१) मनाची मलिनता दूर करणे म्हणजे सद्धम्म.

२) प्रज्ञेला उत्तेजना देणे म्हणजे सद्धम्म.

३) शील जपणे म्हणजे सद्धम्म.

४) करुणेचे संवर्धन करणे म्हणजे सद्धम्म.

५) बंधुभाव वाढवणे म्हणजे सद्धम्म.

६) भेदभाव दूर करणे म्हणजे सद्धम्म.

यावरुन बुद्धांना अपेक्षित धम्म कोणता होता हे समजते. तसेच बौद्ध साहित्याचा संदर्भ देऊन सांगायचे झाले तर, बुद्धांनी त्यांचा धम्म संक्षिप्त रुपात एका व्यक्तिला सांगत असतांना ते एका गाथेत म्हणतात की **सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा। सचितपरियोदपनं एतं बुद्धान सासनं। धम्मपद १४/५.**

यामध्ये त्यांना अपेक्षित धर्म त्यांनी सांगितला आहे ज्याचे विश्लेषण बाबासाहेबांनी वरिलप्रमाणे केलेले दिसून येते तर डॉ. आंबेडकरांना कोणता धर्म अपेक्षित होता हे त्यांनी १२ मे १९५६ रोजी दिल्ली येथील ब्रिटिश ब्रॉडकास्टींगच्या नभोवाणी केंद्रावरील वार्तालापामध्ये स्पष्ट केले होते. त्यावेळी त्यांनी मी बौद्ध धर्माचाच स्वीकार का करणार आहे, याचे स्पष्टिकरण केले होते. ते म्हणतात "इतर सर्व धर्म ईश्वर, आत्मा व मृत्यू नंतरच्या अवस्था अशा गोष्टींचा शोध घेतात. पण बौद्ध धर्मात मात्र तीन तत्वांचा एकत्रितपणे विचार केला आहे. तसा विचार इतर धर्मात केलेला दिसून येत नाही. हा धम्म प्रज्ञा (अंधश्रद्धा आणि अलौकिक घटना विरुद्ध आकलन शक्ति), करुणा (प्रेम) आणि समतेची शिकवण देतो. मनुष्याला पृथ्वीतलावर सुखमय जीवन व्यतीत करण्यासाठी यापेक्षा वेगळे काय हवे ? म्हणून ही तीन तत्वे देणारा बौद्ध धम्म मला आकृष्ट करतो". याचाच अर्थ आंबेडकरांना सुद्धा प्रज्ञा, शील, करुणा, समता, स्वातंत्र्य, बंधुता ही मानवी मूल्य सांगणारा बौद्ध धर्म प्रिय वाटत होता. त्यांना बौद्ध साहित्यातील इतर सर्व अलौकिक, अलंकारिक, अरहंतपद, निर्वाणप्राप्ती किंवा बौद्ध धर्मीय इतर विधी इ. चे आकर्षण नव्हते. वरीलप्रमाणे बुद्धांना अपेक्षित सद्धम्म

आणि बाबसाहेबांना अपेक्षित सद्धम्म यातील साम्य आपणास दिसून येतात.

**बौद्ध धर्माचे वास्तविक स्वरुप :-**

बौद्ध धर्माचे आज वेगवेगळ्या देशामध्ये वेगवेगळे स्वरुप असल्याचे दिसून येते. तसेच भारतात वैदिक (ब्राह्मणधर्म) आणि बौद्ध धर्म यांच्या मिश्रणातून बनलेला मिश्रित बौद्ध धर्म दिसून येतो. भारतातील बौद्ध अनुयायी जे स्वत:ला बौद्ध म्हणून घेतात त्यांचे आचरण पाहता असे लक्षात येते की इतर धर्माला पर्याय म्हणून वेगळा धर्म आचरणात आणला जातोच असे आपणास म्हणता येऊ शकते. म्हणजे इतर धर्मामध्ये जसे त्यांच्या देवीदेवतांची किंवा धर्म संस्थापकाची मूर्ती किंवा एखादी त्यांच्याशी निगडित वस्तु, चिन्ह याची पूजा केली जाते. विधी मंत्र, जप, तप, सण, उत्सव साजरे केले जातात. त्याच पद्धतीने बौद्ध धर्मीयसुद्धा बुद्धांची मूर्ती ठेऊन या सर्व विधी करताना दिसून येतात. इथे फक्त चिन्ह किंवा देवता बदललेले आहेत हाच फरक शिल्लक राहिलेला दिसून येतो पण बाबासाहेबांना किंवा बुद्धांना अपेक्षित तात्विक किंवा नीतितत्वातील बदल जे व्यक्तिच्या आचरणातून प्रकट व्हायला हवे होते ते दिसून येत नाहीत. याचा अर्थ बुद्धांना किंवा बाबासाहेबांना अपेक्षित बौद्ध धर्म भारतात आजपावेतो रुजलेला नाही हे स्पष्टपणे दिसून येते. एवढेच नाहीतर भारतात दिवसेंदिवस बुद्धांनी व बाबासाहेबांनी सांगितलेल्या बौद्ध धर्मात विकृती होत असलेली दिसून येते. मग या विकृतीस कोणते घटक जबाबदार आहेत हे पाहणे महत्वाचे ठरते.

**बौद्ध धर्माच्या विकृतीस जबाबदार घटक:-**

बौद्ध धर्माच्या विकृतीस जबाबदार अनेक घटक आहेत पण त्यातील प्रमुख तीन घटक अत्यंत महत्वाचे मानावे लागतील. त्यामध्ये प्रथम घटक म्हणून बौद्ध साहित्याचा विचार करावा लागेल. बौद्ध साहित्याचा आढावा घेतला असता असे लक्षात येते कि, बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या तीन महिन्यानंतर भिक्षु सुभद्राच्या अभद्र वागण्यामुळे ही बौद्ध संगीती भरवण्यात आली होती. कारण भन्ते सुभद्रा सारखे भिक्खु बुद्धांचा मृत्यू झाला आता कोणी आपल्यावर नियंत्रण करणार नाही म्हणून स्वैर वर्तन करु लागले होते. त्यामुळे स्थविर महाकाश्यप यांच्या अध्यक्षतेखाली अजातशत्रूच्या राजाश्रयाअंतर्गत पाचशे भिक्षु सह पहिली बौद्ध संगीती बोलावण्यात आली. त्यामध्ये बुद्धांच्या उपदेशाचे संगायण करुन मौखिक स्वरुपात संग्रह करुन त्यांना त्रिपिटक असे नाव देण्यात आले. दुसरी बौद्ध संगीती ही बौद्ध संगीती बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या १०० वर्षानंतर भरवण्यात आली होती. ही बौद्ध संगीती वैशाली नगरामध्ये वालुकाराम विहारामध्ये स्थविर रेवत यांच्या अध्यक्षतेखाली कालाशोक यांच्या राजाश्रयामध्ये ७०० भिक्षूंच्या समक्ष भरवण्यात आली होती. यामध्ये सुद्धा त्रिपिटकाचे पुन्हा संगायन करण्यात आले होते. बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर २३८ वर्षांनी सम्राट अशोक यांच्या राजाश्रयानी स्थविर मोगलीपुत्ततिस्स यांच्या अध्यक्षतेखाली तिसरी बौद्ध संगीती भरवण्यात आली होती. त्यावेळी सुद्धा खुप मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्मात विकृती करण्याचे प्रयत्न केले गेले ही बाब सम्राट अशोक यांना समजल्यामुळे त्यांनी बऱ्याच भोंदू भिक्षूंना संघातून बाहेर काढले होते असे म्हटले जाते. चवथी बौद्ध संगीती ही श्रीलंकेत काही भिक्षु आणि राजा वट्टगामिनी यांच्या विचारविनिमयातून भरवली गेली होती. या बौद्ध संगीतीमध्ये मौखिक रुपात असलेले बुद्ध उपदेश विकृत होऊ नये म्हणून त्रिपिटकास लिपिबद्ध करण्यात आले. ही बौद्ध संगीती बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर ४३३ वर्षानंतर भरवली गेली होती. त्यानंतर पाचवी बौद्ध संगीती बर्माचे सम्राट मिन्डोन मिन यांच्या काळात भरवली गेली होती असे दिसून येते.

वरील प्रमाणे काही मुख्य बौद्ध संगीतीची माहिती घेतली असता असे लक्षात येते की बुद्धांच्या नंतर सुमारे ४०० ते ५०० वर्षांमध्ये या बुद्ध उपदेशाचे जसेच्या तसे वाचन झाले नसून त्यामध्ये खूप वाद विवाद होऊन यासर्व भिक्षुच्या सामंजस्याने बौद्ध उपदेश मान्यता प्राप्त करुन घेत, त्यात काही बाबी समाविष्ट करीत काही बाबी वगळून हे बौद्ध साहित्य निर्माण झालेले आहे. म्हणून भाषाशास्त्राच्या नजरेतून ४०० ते ५०० वर्षांमध्ये मौखिक साहित्यात किती प्रमाणात बदल होऊ शकतात. अर्थात त्यांच्या उच्चारणामध्ये, अर्थामध्ये, स्वरुपामध्ये झालेले बदल आणि वादविवादातून स्वीकारलेले बदल या सर्व बाबींचा विचार करुन या साहित्यामध्ये खूप मोठ्या गफलती झाल्या असतील हे मान्य करावे लागते आणि एवढे तर्क असून सुद्धा कोणी म्हणत असेल कि बुद्धांचे उपदेश बौद्ध साहित्यात जसाच-तसे आहेत, त्यात कुठलीही गफलत झाली नाही, तर त्याच्या बुद्धभक्तिची कीव करावी लागेल.

याबाबतीत दुसरा एक तर्क करता येऊ शकतो कि बौद्ध साहित्यात गफलत झाली नसती तर बुद्धविचारामध्ये किवा तत्वज्ञानामध्ये कुठेही विसंगता दिसून आली नसती. पण बौद्ध साहित्यात बरीच विसंगती दिसून येते. उदाहरणार्थ बुद्ध एकीकडे म्हणतात की "देवी चमत्कृतीवर विश्वास ठेवणे म्हणजे अधर्म होय." परंतु बौद्ध साहित्यातच त्रिपिटकातील बुद्धांच्या जन्म वर्णनापासून ते बुद्धांच्या उपदेशापर्यंत सर्व बाबीत बऱ्याच अंशी देवी चमत्कृती झालेली वर्णने केली गेली आहे. तसेच बुद्ध एकीकडे

म्हणतात की ईश्वरावर विश्वास ठेवणे हे धम्माचे आवश्यक अंग नव्हे आणि बौद्ध साहित्यात बऱ्याच ठिकाणी देव खुश झाले, देवांनी पुष्पवृष्टी केली इ. वर्णन आलेले अनेक असे संदर्भ आपण्यास दिसून येतात. इकडे बुद्ध म्हणतात की "ब्रह्म सायुज्यावर आधारित धर्म अधर्म होय" आणि बौद्ध साहित्यात बुद्धांनाच ब्रह्म उपदेश करण्याची विनंती करतात असे वर्णन कलेले आहे. मग हे असे का? असे प्रश्न उद्धवतात. अशा अनेक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करता बौद्ध साहित्यात खूप मोठ्या प्रमाणात विकृती झाली आहे हे सिद्ध होते आणि हे असे असूनही कोणी हे मान्य करीत नसेल तर त्याच्या बुद्धीची कीव करावी लागेल. कारण केवळ धर्मग्रंथ म्हणून कितीही दोष असले तरी तेच प्रमाण आहे असे मानणे म्हणजे सुद्धा बुद्धाने सांगीतल्याप्रमाणे अधर्म ठरेल.

बौद्ध धर्माच्या विकृतीस जबाबदार दूसरा घटक म्हणजे वर्णवादी ब्राह्मण आणि आज ज्यांनी भारताला हिंदुस्थान बनवण्याचा ठेका घेतला आहे अशा विविध हिंदुवादी संघटना होत. भारताचा वास्तविक इतिहास ज्यांनी प्रकाशात आणला असे डॉ. आंबेडकर म्हणतात की, "the history of nothing but a history of a moral conflict between Buddhism and Brahminism" आर्य धर्म, वेदिक धर्म, ब्राह्मण धर्म, वर्ण धर्म आणि आज हिंदु धर्म अशा वेगवेगळ्या नावाचे बुरखे पांघरुण वावरत आलेला मुळ विषमता निर्माण करुन उच्चनिचता निर्माण करुन आपले वर्चस्व साध्य करणारा विषमतावादी धर्म म्हणजेच ब्राह्मण धर्म होय. कारण या धर्माने ज्या ग्रंथांना प्रमाण ग्रंथ मानले आहेत. ते ग्रंथच मुळात विषमतेवर आधारीत आहेत. उदा. वेद, उपनिषद, गीता ही सर्व ग्रंथ वर्ण व्यवस्थेचे कठोरपणे समर्थन करतात. म्हणून हा धर्म सुद्धा विषमतेवर आधारीत असल्याचे सिद्ध होते. तो धर्म क्षत्रिय, वैश्य, शुद्रांचा तर नव्हेच पण जाहिरातीच्या आणि दैवीकरणाचा माध्यमातून कुट नीतीच्या आधाराने तो सर्व भारतीय जनतेवर आजवर थोपला गेला आहे. हा धर्म इतर धर्मातील चांगली तत्वे आपल्या धर्मातील असल्याचे सांगून इतर धर्माचे अस्तित्व नष्ट करतो. हे आता भारतीय तत्वज्ञानाच्या अभ्यासकांना मान्य करावे लागेल. ब्राह्मणांनी भारतामध्ये साम, दाम, दंड, भेद या कोणत्याही नीतीचा असर बौद्ध धर्मावर होत नसलेले पाहून विलीनीकरणाच्या माध्यमातून बौद्ध धर्मामध्ये विकृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही तर स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या विद्वानांनी सुद्धा बौद्ध धर्म ही हिंदु धर्माचीच शाखा आहे. असे भाकीत केले. अशा विविध मार्गाने बौद्ध धर्माचे विकृतीकरण करण्याचे प्रयत्न केले गेले आणि आजसुद्धा ते प्रयत्न चालू असल्याचे दिसून येते. कारण भारतामध्ये ब्राह्मण व्यवस्था कायम ठेवण्यासाठी हा खोडसाळ प्रचार केला जातो. तसे केले नाही तर भारतातील कोणतीही ब्राह्मणी राजकिय पार्टी आपले बहुमत सिद्ध करु शकत नाही आणि बहुमताशिवाय सत्ता मिळवणे शक्य नाही म्हणुन हा चुकीचा प्रचार केला जातो व भारतीय जनतेची दिशाभुल केली जाते. मग हिंदु महासभेच्या नावावर बौद्ध भिक्खुंचे प्रवचन ठेवणे. बौद्ध अनुयायांना भुलवून त्यांचा वापर या कामासाठी करणे, इ. प्रयत्नातून बौद्ध धर्मात विकृती घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला जातो व भारतीय जनतेची दिशाभुल केली जाते.

तिसरा महत्वाचा घटक अर्थात निष्क्रिय मानवी प्रवृत्ती होय. मानवाच्या जीवनावर सर्वात जास्त प्रभाव हा स्वत:च्या मनाचा असतो कारण प्रत्येक जण स्वत:चं स्वत:चे जीवन घडवतो या तथागतांच्या तत्वानुसार भारतातील लोकांनी बौद्ध धम्माची चिकित्सा करुन बौद्ध धर्म स्वीकारला नसून तो अनुकरणातून स्वीकारलेला दिसून येतो. कारण बौद्ध धम्म समजणे म्हणजे खऱ्या अर्थाने मानवी मनामध्ये चिकित्सा जागृत होणे व त्यातून जगाला सुखकर असे विज्ञाननिष्ठ जीवन जगणे होय. यासाठी इतर दुसरा कोणी जबाबदार नसून प्रत्येक व्यक्ती स्वत:च जबाबदार आहे कारण बुद्ध म्हणतात **'अत्ता ही अत्तनो नाथो को ही नाथो परो सिया'** अर्थात आपणच आपले स्वामी आहोत; दुसरा कोण स्वामी असणार? परंतु भारतीय जनतेची मनोवृत्ती शिक्षणाच्या अभावामुळे विकलांग झाली आहे. ब्राह्मणी वर्चस्वामुळे भारतीय बहुजनांना शिक्षण घेता आले नाही. शिक्षण हे क्षेत्र मानवी मनामध्ये चिकित्सा करण्याचे साधन होय, तेच हिरावून घेतल्याने ब्राह्मणांनी जे-जे थोतांड वर्णिले ते-ते भारतीयांच्या मन मस्तकात हजारो वर्षापासून बिंबले आहे. त्यामुळे चिकित्सा प्रवृत्तीच नष्ट झाल्याने सर्व समस्यांचा उद्भव झालेला दिसून येतो. त्याच्या परिणामातून बौद्ध धम्मातील विकृती भारतीय जनता सहन करते आहे आणि बाबासाहेबांनी आम्हाला सर्वश्रेष्ठ असा बौद्ध धर्म दिला आहे, असे म्हणून त्याची कसलीच चिकित्सा न करता त्याचे गुणगान करीत आहे. अर्थात विकृत धर्म म्हणजे अधर्म अनुकरण करीत आहे. त्यामुळे बौद्ध धर्माच्या विकृतीला चालना मिळत आहे. याच्या व्यतिरिक्तही अनेक घटक बौद्ध धर्माच्या विकृतीस जबाबदार असल्याचे सांगता येतील पण ते या मुख्य घटकाच्याच उपशाखा असतील. ज्यामुळे बौद्धधर्म विकृत झालेला दिसून येतो.

**बौद्ध धर्माच्या पुन:स्थापनेची आवश्यकता**

वरीलप्रमाणे बौद्ध धर्मामध्ये झालेल्या विकृती सुधारणे महत्वाचे ठरते. त्यासाठी काही महत्वाचे मुद्दे सांगता येतील.

१) मानवी जीवनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास करण्यासाठी जे लोक बौद्ध धम्माचा अभ्यास करीत आहेत त्यांना बौद्ध धम्मातील चमत्कृती या तर्कबुद्धीला आणि विज्ञानवादाला बाधक ठरतात म्हणून याची पुनर्रचना करणे महत्वाचे ठरते.

२) मानवी मनाचा वैज्ञानिक अभ्यास होण्यासाठी बौद्धधर्मीय जनता ही ज्याप्रमाणे साहित्यामध्ये सांगितले आहे त्याला प्रमाण मानत असल्याने बुद्धांना देव समजून ही आपल्या आवाक्यातील बाब नाही असे समजून मनाचा अभ्यास करीत नाही म्हणून बौद्ध धम्मामध्ये खऱ्या अर्थाने मनाचा वैज्ञानिक अभ्यास मांडला आहे त्याचा प्रचार प्रसार आणि त्यामध्ये आचार व्यवहारात आणण्यसाठी या साहित्याची व बुद्ध धम्माची पुन्हा स्थापना होणे आवश्यक आहे.

३) बौद्ध धर्माचे साहित्य हे पूर्णपणे अलौकिक, चमत्कारिक, काव्यमय लिखाणाखाली झाकले गेले आहे. त्याचा वास्तविक इतिहास समजण्यासाठी बुद्ध धम्माची पुन:स्थापना आवश्यक ठरते.

४) खऱ्या अर्थाने बुद्धांची हीच वैश्विक कल्पना होती की सर्वजण सुखी झाले पाहिजे जगात सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली पाहिजे परंतु बुद्धांचा संदेश योग्यप्रकारे जनतेमध्ये न रुजल्यामुळे आणि विकृत झालेल्या धर्माचे आचरण केल्यामुळे हा त्यांचा उद्देश पूर्ण झालेला नाही तो पूर्ण करुन वैश्विक शांतता प्रस्थापित करण्यासाठी बौद्ध पुन:स्थापना होणे अत्यंत महत्वाचे ठरते.

**निष्कर्ष :-**

"हीनं धम्म न सेवेय्य, पमादेन न संवसे।" धम्मपद १३/१ अर्थात हीन धर्म सेवन करु नये, प्रमादाने वागू नये परंतु आज वास्तवात सर्वधर्म समभावाची हाकाटी देऊन जे हीन धर्म आहेत ते चांगल्या धर्माची बरोबरी करु पाहत आहेत. त्यापुढे जाऊन ब्राह्मण धर्मीयांनी तर बौद्ध धर्माला पोटाशी धरुन त्यास नष्ट करण्याचा चंग बांधलेला दिसून येतो आणि तो बऱ्याच प्रमाणात यशस्वीसुद्धा होताना दिसून येत आहे. त्यामुळे मूळ बुद्ध धम्म दिसेनासा झाला आहे. परिणामत: बुद्ध धम्माचा भारतीय जनतेवर जो प्रभाव पडायला हवा होता तो प्रभाव दिसून येत नाही. लोकांनी बौद्ध धर्माचा स्विकार करुनही त्यांच्या वर्तनात, आचरणात कोणताही बदल दिसून येत नाही. कारण भारतात बौद्धधर्म आणि हिंदू धर्माचा म्हणजेच मुळ ब्राह्मणी धर्माचा संकर झालेला दिसून येतो. बाबासाहेब आंबेडकरांनी खूप निक्षून सांगितले होते की "हिंदु धर्म हे गटारातले घाण पाणी आहे बौद्ध धर्म हे झऱ्याचे शुद्ध पाणी आहे पण हे दोन्ही मिळाले तर गटारातल्या पाण्यामुळे शुद्धपाणी सुद्धा घाणच होईल." पण या विधानाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे भारतीय बौद्ध धर्मात विकृती झालेल्या आहेत. त्यात सुधारणा करुन बाबासाहेबांचा व तथागत गौतम बुद्धांचा बौद्ध धर्माप्रति असलेला उद्देश पुर्ण करण्यासाठी बौद्ध धर्म साहित्याचा चिकित्सात्मक अभ्यास करण्याची आणि त्यातील बुद्धांच्या तत्वज्ञानाला विसंगत बाबींचा समाचार घेऊन बौद्ध धर्माची पुन:स्थापना करण्याची अनिवार्य आवश्यकता स्पष्ट होते.




आयु. बापुराव झोटिंगराव कांबळे

वाढदिवसाच्या हार्दिक मंगल कामना - दि. १० मे २०२१

**शुभेच्छुक**

आयु. माया बापुराव कांबळे (पत्नी)
आयु. रुक्मिणी संजय सरवदे (मुलगी)
डॉ. राहुल बापुराव कांबळे (मुलगा)
आयु. रविकिरण बापुराव कांबळे (मुलगा)
आयु. धम्मदीप संजय सरवदे (नातु)
आयु. संजय सरवदे (जावई)
आयु. सोनाली राहुल कांबळे (सुन)
इंजि. ऋषिकेश बापुराव कांबळे (मुलगा)

**आणि समस्त कांबळे परिवार, लातुर**

## धम्म चळवळीतील युवकांची भूमिका

*- अमित मेधावी, कोल्हापूर*
मोबाईल - ९७६४३४६७९३

तथागत भगवान बुद्धांनी २५०० वर्षापूर्वी भारतीय समाजामध्ये जी **"बहूजन हिताय बहुजन सुखाय"** हे ब्रीद असणारी लोककल्याणकारी चळवळ निर्मिाण केली. तिला धम्मचळवळ हे नामाभिधान प्राप्त झाले. तथागतांनी जो दुःखमुक्तीचा मार्ग शोधला, त्याचा उपदेश आषाढी पौर्णिमेला सारनाथ या ठिकाणी पंचवर्गीय भिक्खूंना केला. त्यानंतर यश नावाचा वैफल्याने ग्रासलेला धनश्रेष्ठीचा मुलगा त्यांच्या संपर्कात आला. तथागतांच्या भेटीने त्याच्या हृदया-मस्तकात जणू सुखप्रवाहाचे गुंजारव निर्माण झाले. त्यामुळे यश तथागतांना शरण आला. धम्मासारखी अमूल्य गोष्ट एखाद्याला मिळाली, तर ती एकट्यापुरती राहत नाही., मी जसा लाभान्वित झालो, तसेच सर्वजण या मार्गाचा लाभ घेवोत, ही भावना निर्माण होते. यशचेही तसेच झाले. त्याच्या पुढाकारामुळे त्याचे ५४ मित्र तथागतांना शरण गेले. तथागत, पंचवर्गीय भिक्खू, यश आणि त्याचे ५४ मित्र असे एकूण ६१ जण सारनाथ कडून वाराणसीला गेले आणि तेथे संघाची स्थापना केली. गया येथे सिद्धार्थांना बोधि प्राप्त झाली, अर्थात बुद्धांचा जन्म झाला. सारनाथ येथे तथागतांनी पहिला उपदेश केला, धम्मचक्रप्रवर्तन केले, अर्थात धम्माचा जन्म झाला. वाराणसी येथे भिक्खूसंघाची स्थापना करण्यात आली, अर्थात संघाचा जन्म झाला. तथागतांनी या नव्या भिक्खूंना उपदेश करताना म्हटले, **"हे भिक्खूंनो मी सर्वप्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे आणि तुम्ही सुद्धा मुक्त आहात. सर्व दिशांना जा आणि बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या सुखासाठी चारिका करा."** हा क्षण खऱ्या अर्थाने धम्म चळवळीची सुरुवात होती. युवकांच्या माध्यमातून सुरु झालेली ही चळवळ भारतातील सुवर्णयुगाची नांदी ठरली.

तथागतांच्या परिनिब्बानानंतर २५०० वर्षांनंतर पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे ऐतिहासिक धर्मांतर केले. धम्मचळवळीला आलेल्या ग्लानीचे आपल्या धम्मक्रांतीने उत्साहात रुपांतर केले. १४ ऑक्टोबर १९५६ च्या विजयादशमी दिनी स्वत: भन्ते चंद्रमणी यांच्या हस्ते बाबासाहेबांनी दीक्षा ग्रहण केली आणि आपल्या लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. ही घटना ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय क्रांतिकारक होती. एखाद्या उपासकाने दुसऱ्या उपासकाला दीक्षा देणे हे बौद्ध परंपरेमध्ये प्रथमच घडले. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना आणि अखिल बौद्ध जगताला नवा संदेश यामधून दिला. तो संदेश म्हणजे **"दरेकाने दरेकाला धम्मदीक्षा द्या"** हा होय. जो कोणी धम्माचे आचरण करेल, त्याला दुसऱ्याला धम्म सांगण्याचा अधिकार आहे.

### क्रांतीची भाषा युवकच बोलू शकतात.

तथागतांनी प्रस्थापित विषमतेच्या व्यवस्थेला झुगारुन दिले. बाबासाहेबांनी धम्मक्रांती केली. वाईटाला वाईट आणि चांगल्याला चांगले म्हणण्याचे धाडस फक्त युवकच करु शकतात. आजच्या युवकांपुढे हे दोन्ही आदर्श तीच प्रेरणा घेऊन उभे आहेत. असे म्हटले जाते की, **'वय देहाला असते मनाला नाही, मनाने तरुण असणारी माणसे कधीच म्हातारी होत नाहीत,**. युवक कोणाला म्हणावे या संदर्भात ओशो युवा अवस्थेचे वर्णन करताना म्हणतात, 'Living State of Mind' अर्थात चित्ताची जीवंत अवस्था म्हणजे युवा अवस्था होय. शारीरिकदृष्ट्या युवक असणे म्हणजे खऱ्या अर्थाने युवक असणे नव्हे तर, ज्याच्या मनाची अवस्था उत्साही आहे. ज्याचे तारुण्य हे ज्वलंत धमन्यांचे अविरत स्पंदन बनलेले असते तो **'युवक,** असतो असे म्हणता येईल. समाजातील विषम व्यवस्था, दुःख, अन्याय पाहून ज्याच्या मनात क्रांतीची आकांक्षा निर्माण होते, असा विद्रोहाचा झरा म्हणजे युवक होय; मग तो शारीरिकदृष्ट्या कोणत्याही वयोगटातील असला तरी हरकत नाही..!!

### युवकांनी धम्माच्या उद्देशाचे आकलन करावे.

**'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'** या ग्रंथामध्ये बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्माचे दोन उद्देश्य सांगितले आहेत. युवकांनी या उद्देशाचे आकलन व आचरण करणे हे स्वत:च्या आणि इतरांच्या जीवनाला अधिक उन्नत अवस्थेकडे घेऊन जाणारे ठरेल.

पहिला जो उद्देश आहे तो म्हणजे, **'मनाची मलिनता दूर करणे'** होय. अतिशय मूलभूत अशी ही बाब आहे. आपण जे बोलतो किंवा जी कृती करतो तिच्या पाठीमागे आपल्या मनामध्ये असणारे विचार आणि भावना यांची प्रेरणा असते. मनामध्ये आपण जे रुजवू, तेच आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देते. लोभ, मोह, द्वेष, मत्सर, दुराभिमान वगैरे सारखे चित्तमल नष्ट करुन दानभावना, प्रज्ञा, मैत्री, संवेदनशीलता, स्वाभिमान वगैरेसारख्या गुणांचा विकास करण्यासाठी धम्म मार्गदर्शक ठरतो.

धम्माचा दुसरा उद्देश हा सामाजिक सौहार्द निर्माण करण्यास कटिबद्ध असणारा आहे. तो म्हणजे, **'जग धम्मराज्य बनविणे'** होय. जग धम्मराज्य बनविणे याचा अर्थ असा नाही, की जगातले

सर्व लोक औपचारिकरीत्या बौद्ध बनविणे किंवा सर्वांनी बौद्ध व्हावे असा कट्टरतावाद जोपासणे. तर धम्मराज्य म्हणजे जगामध्ये सदाचरणावर आधारित जीवन जगणाऱ्या लोकांची संख्या वाढवणे. लोक एकमेकांशी मैत्रीने वागतील, असे वातावरण निर्माण करणे. जो जो दु:खी आहे, निराश आहे, अस्वस्थ आहे, अशा लोकांपर्यंत आनंद, प्रेरणा आणि शांततेचा मार्ग पोचविणे, आपल्या भोवताली अशी लोकमंगलाची परिस्थिती निर्माण करणे याचाच अर्थ धम्मराज्य निर्माण करणे हा आहे.

**धम्माचे आचरण ही व्यक्तिमत्व विकासाची प्रकिया आहे.**

जीवनामध्ये प्रत्येकजण विकासासाठी धडपड करीत असतो. अधिक उत्तम आणि मंगलमय गोष्टींचा शोध घेत असतो. तथागतांनी मंगलसुत्तामध्ये ३८ मंगल गोष्टी सांगितल्या आहेत. त्यापैकी प्राथमिक पातळीवर मुलभूत महत्वाच्या दोन गोष्टी म्हणजे, पहिली वेळोवेळी धम्मश्रवण करणे आणि दुसरी वेळोवेळी धम्मचर्चा करणे होय. धम्म ही जीवन जगण्याची कला आहे. पण, जोपर्यंत आपण प्रत्यक्ष आचरण करीत नाही, तोपर्यंत ही कला साध्य होऊ शकत नाही. म्हणून चांगल्या, एकमेकांच्या हिताच्या गोष्टींचे श्रवण केले पाहिजे. धम्मविषयक ग्रंथाचे वाचन व आकलन केले पाहिजे. जाणकारांशी चर्चा करुन शंकाचे निरसन केले पाहिजे. याप्रकारे निकोप जीवनशैलीचा अंगिकार केला पाहिजे.

आपले बोलणे, वागणे आणि विचार करणे यामध्ये ऊर्ध्वगामी परिवर्तन म्हणजेच व्यक्तिमत्वाचा विकास होय. आपल्या मनाला इष्ट प्रशिक्षण देणे हीच धम्माची मूलभूत शिकवण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "The training of the mind to seek the good is the first step in the path of Righteousness This is the main teaching in the Buddhist way of life" मनाला सुसंस्कृत बनविणे म्हणजे आपल्या जीवनातील नकारात्मक जाणिवांचा क्षय आणि सकारात्मकतेचा विकास होय.

**धम्म हा ऊर्जास्त्रोत आहे.**

आधुनिक युगामध्ये युवकांना विविध प्रकारच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. शैक्षणिक प्रगती, आर्थिक प्रगती, कामाची उपलब्धता इत्यादींसाठी मनाचे संतुलन राखून परिश्रम करणे आवश्यक असते. विविध प्रकारच्या स्पर्धापरीक्षांना सामोरे जाण्यासाठी सुदृढ शरीराबरोबरच सुदृढ मनाचीही गरज आहे. एकाग्रता, स्थिरता याबाबी आपणाला ध्येयापर्यंत जाण्यासाठी मदतच करत नाहीत, तर एक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडतात. तथागतांनी मनाच्या एकाग्रतेसाठी ध्यानसाधनेची पद्धती विकसित केली आहे. वैज्ञानिक पद्धतीने मानसिक ऊर्जेचे एकत्रिकरण करुन योग्यप्रकारे ती ऊर्जा प्रवाहित करण्याचे काम या ध्यान सरावांमधून साध्य होते. धम्म म्हणजे जागृतीचा सराव आहे. त्यामुळे आळसा सारख्या शत्रूला हद्दपार करण्याची कृती म्हणजे धम्म आहे. अनेकवेळा लोक काम टाळण्यासाठी वेगवेगळ्या सबबी सांगतात, जसे की, **"आज खूप थंडी आहे, खूप गरम होत आहे, आता वेळ झाला, आत्ताच तर पहाट झाली, भूक लागली आहे, खूप खाल्ले आहे..."** अशाप्रकारची कारणे सांगणाऱ्यांना यश कधीच मिळत नाही. प्रयत्नवादाचा उपदेश करताना सिगालसुत्तामध्ये तथागत म्हणतात, **"जो मनुष्य थंडी आणि उष्णता यांना गवताच्या काडी इतकीही किंमत देत नाही आणि आपली कर्तव्ये पार पाडतो, त्याचे सुख त्याला सोडून जात नाही."** अशाप्रकारे धम्मामध्ये प्रेरणेचा आणि ऊर्जेचा साठा आहे, कधीही न संपणारा ....!

**युवकांची जबाबदारी मोठी आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, बौद्धांनी केवळ एक चांगला बौद्ध असणे पुरेसे नाही तर, त्यांनी धम्माचा प्रचार आणि प्रसार करायला हवा, कारण **"धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे हीच खरी मानवसेवा आहे"**. धम्म प्रयत्नवाद शिकवतो, आशावादी बनवितो, लढण्याची ऊर्मी देतो म्हणून हा परिवर्तनाचा आचरणमार्ग अधिकाधिक लोकांपर्यंत पोचला पाहिजे. या सदाचार आणि मानवतेच्या शिकवणीची आज सर्व मनुष्यमात्राला पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने आज गरज आहे. व्यक्तिगत विकासाबरोबरच सामाजिक विकासाला गती देण्यासाठी धम्म लोकांपर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून पोचायला हवा. यासाठी स्वत: धम्म जाणून घ्यायला हवा. धम्माच्या मूलभूत शिकवणी जसे, त्रिसरण, पंचशील, पारमिता, धम्मेंद्रिये, सप्त बोध्यांगे, अष्टांगिक मार्ग यांसारख्या जीवनमूल्यांचे बौद्धिक आकलन व आचरण करुन स्वत:ला एक मॉडेल म्हणून समाजापूढे चांगुलपणा आदर्श ठेवायला हवा.

भारतामध्ये धम्मप्रचार करण्याचा अनेक व्यक्ती व संस्था प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. भारतीय बौद्ध महासभा, त्रिरत्न बौद्ध महासंघ यांसारख्या अनेक संघटना धम्म पोचवत आहेत तसेच विपस्सनाचार्य गोएंका गुरुजी, पू. दलाई लामा यांसारख्या धम्मगुरुंचेही काम मोठे आहे. प्रत्येकजपण आपापल्या परीने लोकांपर्यंत बुद्धविचार नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशाप्रकारच्या सर्व संस्था, व्यक्ती इत्यादींचा आत्यंतिक कृतज्ञतेने आदर केला पाहिजे. प्रत्येकाची धम्मप्रचाराची शैली वेगळी असेल पण, ध्येय एकच आहे आणि ते म्हणजे '**मानवसेवा**' होय.

स्वत:ला परिवर्तित करण्यासाठी युवकांनी धम्मशिबीरांमध्ये सहभागी व्हायला हवे. जसे की, श्रामणेर शिबीर, विपस्सना शिबीर, निवासी धम्मशिबीर इ. स्वत:ला अधिक जाणून घेण्याची, क्षमतांचा विकास करण्याची आणि जाणकारांचे मार्गदर्शन मिळण्याची संधी या शिबीरांमधून मिळत असते. आठवड्यातून एकदा बुद्धविहारात जाऊन धम्मश्रवण व धम्मचर्चेत सहभागी झाले पाहिजे. आठवड्यातून किमान एक तास आपले ज्ञान, कौशल्य इ. चा लाभ इतरांना द्यायला हवा.

जे लोक औपचारिकरित्या बौद्ध नाहीत, त्यांच्यापर्यंत करुणेने, मैत्रीने व्यवहार ठेऊन बुद्धांचा मंगलमय विचार पोचविला पाहिजे. कारण सर्वांना सुखाची आणि शांततेची गरज आहे. बुद्धविचार हा सर्वांना सुख आणि शांती प्रदान करणारा आहे, प्रत्येक व्यक्तीला उन्नत अवस्थेकडे नेणारा आहे. आपल्याला मिळालेली ही तीन अमूल्य रत्ने सर्वांपर्यंत पोचविण्याचा संकल्प डॉ. बाबासाहेबांच्या आणि म. जोतिबा फुलेंच्या जयंतीनिमित्त करुया. या मंगल संकल्पाने सर्व मनुष्यमात्र निरामय जीवनाचा आनंद उपभोगतील. स्वत:च्या कल्याणाबरोबरच इतर सर्व प्राणिमात्रांच्या हितासाठी माझ्या युवक बंधु भगिनींनो धम्मचळवळ अधिक गतिमान करुया......

सर्वांचे मंगल होवो, कल्याण होवो....!!

(लेखक धम्माचे अभ्यासक आहेत)

---

**बोधगयेच्या पवित्र भुमिवरील अखिल भारतीय भिक्खु संघाच्या विद्यमान विहारास दानाचे आवाहन...**

*पान क्र. १६ वरुन सुरु*

आहे की, इतर भिक्खुंनी जागा खरेदी करणे, वेगळे विहार बांधणे ह्यात पैसा, वेळ, श्रम गमवूनही अ.भा. भिक्खु संघाच्या ह्या विद्यमान विहाराएवढे बांधकाम करणे शक्य नाही त्यामुळे वेगळी शक्ती खर्च न करता याच विहाराला भव्य दिव्य करा, वाढवा जागा खुप मोठी आहे.

स्वत: संचालक व्हा परंतु त्यांच्या या बोलण्याला प्रतिसाद मिळाला नाही. जेव्हा हि बाब पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई अध्यक्ष अरविंद भंडारे, शांतारामजी इंगळे यांच्यासमोर भन्तेजींनी सांगितली तेव्हा आम्ही पालि रिसर्च इन्स्टिट्युटच्या सर्व लोकांनी सदर विहार व संघारामाला प्रशस्त वाढवण्याचा निर्धार केला. त्यावर विहाराचे मुख्य संचालक पु. भदन्त प्रग्यादिप यांनी आनंद व्यक्त करुन सहमती दर्शविली. महाराष्ट्रातील लोकांना सन्मानपुर्वक राहण्यासाठी उपयोगी असलेल्या ह्या विहारातील निवासस्थानावर दुसऱ्या मजल्यावर सध्या दोन-तीन रुम बनविणे, तसेच आधीच तयार असलेल्या रुमची डागडुगी, कलर करणे, असा प्राथमिक संकल्प आहे. त्यावर काही श्रद्धावान उपासकांनी आनंद व्यक्त करत दान देण्याला सुरुवात केली आहे.

महाराष्ट्रासह भारतभर धम्मकार्यात शुद्ध-परिशुद्ध, प्रसिद्ध असलेली पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई हि धम्मसंस्था आपणांस आवाहन करीत आहे की, श्रद्धावान उपासकांनी, उपासिकांनी ह्या पवित्र धम्मकार्यास श्रद्धापुर्वक शुद्ध भावनेने दान करावे. दान देतांना दानाचे मोजमाप संख्येने नव्हे तर श्रद्धेने करावे. संस्था अध्यक्ष अरविंद भंडारे यांनी प्रत्येकी दहा हजार रुपये दान देण्याचे आवाहन केलेले आहे मात्र कुणी १०,०००/-, ५,०००/-, २,०००/-, १,०००/- सुद्धा देऊ शकता हे दान बोधगयेतील पवित्र भुमीवर जाणार असल्यामुळे महान फलदायक आहे. काम खुप मोठे असल्यामुळे जसे-जसे दान मिळत राहील तसे-तसे विहाराच्या वरील मजल्याचे काम होत राहील.

सर्वांनी दृढतापुर्वक योगदान दिले तर संकल्पित कार्य लवकर पुर्णत्वास जाईल. सदर विहार आपल्या सगळ्यांच्या हक्काचे आहे. जगातील सर्वात पवित्र पावण बोधगया च्या भुमीवर दान दिल्याचे समाधान आपल्याला मिळेल. विदेशातील श्रद्धावान बुद्ध अनुयायी प्रसन्न मनाने हजारो रुपये बोधगयेच्या पवित्र भुमिवर दान देण्यात धन्यता मानतात. आपणही ह्या भुमिवर दान देण्याचा संकल्प करावा कारण ह्या पवित्र वास्तुमध्ये नित्य सुत्तपठण बुद्धवाणीचे उच्चारणामुळे, भिक्खु-भिक्खुनी, उपासक-उपासिकांना धम्मलाभ होणार. म्हणून यापेक्षा महान फलदायी दान अन्यत्र होऊ शकत नाही. जिथे शांती आहे, प्रसन्नता आहे, पवित्रता आहे, शिलाचरण आहे, बुद्धवाणी आहे, विवाद नाही साधुवाद आहे, हानी नाही धम्मलाभ आहे. पवित्र बुद्धवचनाच्या उच्चाराने व्याप्त ह्या भुमित दान देण्याची महान संधी आपणास पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई च्या वतीने मिळत आहे. ह्या दानकार्यात पालि रिसर्च इन्स्टिट्युट फक्त एक माध्यम आहे. यात श्रेय घेण्याचा कोणताही हेतू नसुन फक्त सेवा देणे हेच संस्थेचे अंतीम ध्येय आहे.

संपर्क - ***अरविंद भंडारे,*** पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई
मोबा. ९९६७६९२०१४
- ***भन्ते प्रग्यादिप*** , अखिल भारतिय भिक्खु संघ
मोबा. ९९३४६११४८०

# सर्वव्यापी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*- गौतम कदम, नवी मुंबई*
मोबाईल - ९९८७५३६८३२

"भीमराव आंबेडकर हे केवळ भारतीय विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा सर्वात बुद्धिमान विद्यार्थी आहेत." हे उद्गार आहेत प्रा. सेलिग्मन अर्थात एडविन रॉबर्ट अॅन्डरसन सेलिग्मन यांचे. डॉ. आंबेडकर अर्थशास्त्र, राजकारण, मानववंशशास्त्र, नीतिशास्त्र, व्यापार, समाजशास्त्र या विषयांचा सखोल अभ्यास करत असताना त्यांनी कोलंबिया विद्यापीठाला दि. १५ मे, १९२५ रोजी 'अॅडमिनिस्ट्रेशन अॅन्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी हा प्रबंध सादर करुन दि. २ जून १९२५ रोजी याच प्रबंधाच्या आधारावर त्यांनी एम.ए. ची पदवी मिळवली. ग्रंथालयात सर्वांच्या अगोदर हजर होऊन सर्वांच्या नंतर जाणाऱ्या या बुद्धिमान विद्यार्थी विद्यार्थ्यांबद्दलचे कुतूहल दरम्यानच्या काळात कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथालयात पंजाबचे केसरी म्हणून प्रसिद्ध झालेले लाला लजपतराय यांना टाळता आले नाही. या दोघांमधल्या चाललेल्या संवादात प्रा. सेलिग्मन यांनी वरील उद्गार काढले होते. डॉ. आंबेडकर यांचा वर्गाबाहेर बसलेला विद्यार्थी ते जगातला सर्वात बुद्धिमान व्यक्ती हा प्रवास खचितच साधा सरळ नव्हता. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या वर्णव्यवस्थेमुळे वर्गाच्या बाहेर बसून अभ्यास सुरु करत त्याच वर्णव्यवस्थेला मुळासकट उखडून फेकून देण्यासाठी आणि भारतात सखोल समानतेसाठी डॉ. आंबेडकर यांनी अख्खी हयात खर्ची घातली.

जागतिक दर्जाचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडीत, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार, शिक्षणतज्ज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, लेखक, प्राध्यापक, समाज सुधारक, बॅरीस्टर, वक्ते, पत्रकार, जलतज्ञ, संपादक, स्वातंत्र्य सेनानी, संसदपटू, स्त्रियांचे कैवारी, मजूरमंत्री, मानवी हक्कांचे कैवारी आणि भारतात जन्म होऊन भारतातूनच हद्दपार झालेला बौद्ध धर्म पुनरुत्थापक, भारत देशातील कोट्यावधी शोषित पददलितांचे उद्धारक, स्वतंत्र भारताचे पहिले '**कायदा मंत्री,** आणि स्वतंत्र भारतीय संविधानाचे शिल्पकार अशा अनेक बिरुदावल्या त्यांच्याच नावापुढे शोभून दिसतात. २०१२ साली झालेल्या आंतराष्ट्रीय सर्वेक्षणात स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतातील सर्वांत बुद्धिमान व्यक्ती म्हणून त्यांना घोषित करण्यात आले. त्याचप्रमाणे कोलंबिया विद्यापीठाने देखिल जगातल्या शिर्ष १०० विद्वानांची यादी तयार करुन त्यात प्रथम स्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाच जगातला प्रथम स्थानी असलेला महाविद्वान म्हणून गौरव केला.

देशात स्वातंत्र्याची लाट फोफावली असताना या असामान्य तसेच कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांने अतिशय हालाखीच्या परिस्थितीत देशविदेशात शिक्षण घेत असताना भारतात चाललेल्या जातीव्यवस्थेतून निर्माण झालेल्या विषमतेवर तसेच अस्पृश्यतेवर कडाडून घाव घालून इंग्रजांना तसेच इथल्या जातीव्यवस्थेची कातडी पांघरुण घेऊन बसलेल्या तत्कालीन धर्ममार्तंडांना नामोहरम करुन सोडले. इथल्या प्रत्येक भारतीयाला परकिय ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य हवे होते आणि दुसरीकडे बाबासाहेब आंबेडकरांना ब्रिटिशांपासून सुटकेसोबत हजारो वर्षांच्या मानसिक गुलामगिरी मधून शोषितांचे स्वातंत्र्य हवे होते आणि त्यांना सामाजिक स्तरावर त्यांचे अहम स्थान मिळवून देण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर कटिबद्ध होते. म्हणूनच एक महान व्यक्ति एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तिपेक्षा वेगळा असतो, कारण **"तो"** समाजसेवेसाठी नेहमीच तयार असतो. याच मुर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

शैक्षणिक क्षेत्रात बी. ए. डबल एम.ए., पी.एच.डी., एम.एस.सी.,डी. बार-अॅट-लॉ अशा एकूण ३२ पदव्या डॉ. आंबेडकरांनी संपादित केल्या आणि एकंदरीत सगळ्या अभ्यासाचा आणि विद्येचा इथल्या शोषित पिडितांच्या संवर्धनासाठी पुरेपूर वापर करुन भारतातल्या मानसिक गुलामगिरीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. तेव्हा कुठे इथल्या जातीव्यवस्थेची पाळेमुळे खिळखिळी होऊन अस्पृश्य मुख्य प्रवाहात आले हा इतिहास आहे.

क्रुरतेवर आणि वर्णव्यवस्थेवर तसेच विषमतेवर आधारलेल्या मनुस्मृती या ग्रंथाचे २५ डिसेंबर १९२७ रोजी जाहिरपणे दहन करुन इथल्या जातीयवाद्यांना पळता भुई थोडी केली. या मनुस्मृती ने हिंदू समाजाचे दीड-दोन हजार वर्षे नियमन करुन हिंदू हिंदू मध्येच श्रेष्ठ कनिष्ठ अशा विषमतेला खतपाणी घातले होते आणि आपल्याच बांधवाला इतकी वर्षे अतोनात छळले होते तसेच हक्कांपासून वंचित ठेवले होते. आंबेडकरांनी समग्र पद्दलितांना आणि वंचिताना न्याय हक्क मिळवून देताना मनुस्मृती जाळून जातिय तसेच मानसिक गुलामगिरीच्या बेड्या तोडून फेकून दिल्या.

इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीमधून स्त्रिया ही सुटल्या नव्हत्या म्हणून त्यांनी स्त्रियांना न्याय, हक्क आणि समान वागणूकीचा दर्जा मिळवून देण्यासाठी हिंदू कोड बिल सादर केले. परंतु दुर्दैवाने

काही सनातनी लोकांनी ते पुर्ण होऊ दिले नाही. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी नेहरुंच्या तोंडावर मंत्रीपदाचा राजीनामा फेकून मारला. हल्लीच्या राजकारण्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे परंतु ते कदापी देणार नाहीत हे धडधडीत सत्य आहे. पुढे भारताची राज्यघटना तयार करताना हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसाहक्क कायदा, हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा, हिंदू दत्तक व पोटगी कायदा असे चार महत्वाचे कायदे पास करुन घेतले आणि इथूनच स्त्रियांना समान दर्जा कायदेरुपात प्राप्त झाला आणि स्त्री जीवनात आमूलाग्र बदल होत गेला. कामाचे आठ तास गरोदरपणात असलेल्या सहा महिन्यांच्या रजा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सुपीक डोक्यातुन कायद्यात समाविष्ट झालेली अतिशय आवश्यक बाब आहे.

कित्येक वर्षे मुद्दामहून मागास ठेवलेल्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आरक्षण लागू करुन इथल्या दबलेल्या जनतेसाठी स्वातंत्र्यांची तसेच प्रगतीची नवी दालने खुली करुन दिली. सोबत सदर आरक्षणामुळे अपेक्षित बदल घडून आल्यावर अर्थात न्याय हक्कात समानता आल्यावर तसेच शैक्षणिक प्रगती होऊन जीवनमानाचा दर्जा सुधारल्यावर ठराविक काळानंतर आरक्षण रद्दबातल करावे असेही नमुद करुन ठेवले. परंतु इथल्या राजकीय पुढाऱ्यांनी त्याच आरक्षणावर राजकारण करत मतपेट्यांची गणिते मांडली आणि जातीव्यवस्थेला अजूनच खतपाणी घातले. आरक्षण बंद करावे म्हणून इथले सर्वजण बेंबीच्या देठापासून ओरडत असतात परंतु ज्या जातीव्यवस्थेतून आरक्षणाचा जन्म झाला ती जात सोडायला किंवा जातीचे सकूळ उच्चाटन करायला कोणीही धजावत नाही ही वस्तुस्थिती आणि शोकांतिका आहे. या जातीच्या राजकारणातच देशाचा सामाजिक स्तर खालावत आहे आणि खरंतर आज ही विस्थापित तसेच पिचलेल्या लोकांना आरक्षणाची तितकीच गरज आहे हे खेडोपाड्यातल्या तळागाळात तसेच आदिवासी बहुल भागात फिरल्यावर निदर्शनास येते.

सवर्णांनी खालच्या जातीतल्या लोकांना पाणी पिण्यास ही मज्जाव केला होता म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा चवदार तळे हा ऐतिहासिक सत्याग्रह करुन अस्पृश्यांना पाणी खुले करुन दिले. तसेच प्राणीमात्रावर दया करणाऱ्या हिंदू धर्मात माणूस असलेल्या परंतु वर्णव्यवस्थेचे बळी ठरलेल्या अस्पृश्यांना काळाराम मंदिरासारख्या कित्येक मंदिरात मंदिर प्रवेशास मुभा मिळवून देत देवाला आणि पाण्याला सर्व माणसे सारखीच असतात हे सिद्ध करुन माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेली समानतेची शिकवण दिली. या दोन्ही गोष्टींमध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजकारणाला मनोभावे मानणारी काही सुशिक्षित ब्राह्मण मंडळी सुद्धा बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत होती.

ऐतिहासिक गोलमेज परिषदेत भारतातल्या अस्पृश्य लोकांचे सामाजिक स्थान आणि दयनीय अवस्थेची भयानकता जगासमोर मांडत इथे राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करत ब्रिटिशांनी येथून लवकरात लवकर चालते व्हावे म्हणून आग्रह धरला. तसेच ऐतिहासिक पुणे करारामुळे उपोषणाला बसलेल्या गांधीजींचे केवळ प्राण वाचावेत म्हणून सही करणारे बाबासाहेब आंबेडकर हे एकमेवाद्वितीयच. एकिकडे स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे परंतु दलितांच्या राजकीय अधिकारांना बगल देणारी गांधीजींची ही अतिशय धूर्त राजकिय खेळी होती.

विद्वत्तेच्या महासागरातील प्रकाशाचे विविध पैलू असणारे मोती म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आणि शोषितांच्या, पद्दलितांच्या अन्यायाला वाचा फोडून हजारो वर्षांची मानवीय मूल्ये पायदळी तुडवणारी घाणेरडी परंपरा मोडीत काढणारा मसीहा म्हणजे आंबेडकर. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारलेली राज्यघटना देशाला बहाल करुन त्यांनी देशाची मान जागतिक स्तरावर उंचावली आणि तरीही घटनेत समतोल साधताना प्रस्थापित आणि विस्थापित या दोघांनाही समसमान कायद्यांची तरतूद करुन दिली. कायद्याने कोण्या एका वर उगाचच अन्याय अत्याचार होऊ दिले नाहीत. हल्ली इथे घटनेला पायदळी तुडवले जाते ही गोष्ट निराळी आहे. शासनकर्त्यांची कुचकामी भुमिका अशीच चालू राहिली तर देश पुन्हा एकदा अराजकतेकडे झुकला जाईल ही भीती आहे.

आंबेडकरवाद म्हणजे वादविवादाचा विषय नाही तर आंबेडकरवाद म्हणजे मानवतेच्या आधारावर प्रथमत: व्यक्ती, समाज, समुह आणि राष्ट्रीय एकात्मतेचे तत्वज्ञान आहे, मानवी मुल्यांसोबत स्वातंत्र्यता, समानता, बंधुता राखण्याचा दृष्टिकोन आहे इतके लक्षात घेतले तरी मिळवले. आंबेडकर वादाने एक गोष्ट प्रामुख्याने अधोरेखित होते ती म्हणजे विषमतेची व्यवस्था बदलल्याशिवाय जगाची सुधारणा किंवा उन्नती होऊच शकत नाही. हेच आंबेडकरावादाचे वास्तव आकलन आहे, आंबेडकरवाद हा सम्यक क्रांतीसह सम्यक विकासाचा बहुआयामी मार्ग आहे म्हणून तो वैश्विक स्वरुपाचा आहे आणि आधुनिक जगाच्या धारणेला तो अतिशय पोषक आहे.

धर्मांतर करुन त्यांनी इथल्या हजारो वर्षे गुलामगिरीत आणि विपन्नावस्थेत खितपत पडलेल्या मागासवर्गाला बौद्ध धर्माची दीक्षा

देऊन मुक्तीच्या मार्गावर स्वत:ही मार्गक्रमण केले. लक्षात घ्या... कोणताही धर्म वाईट शिकवण देत नसतो परतु तथाकथित धर्ममार्तंडांच्या मागे जाऊन दुसऱ्या मानवाला छळणे सुद्धा चुकीचे धर्माचरण आहे आणि इतकी वर्षे हेच घडत आले म्हणून भारतात वर्णव्यवस्था चालत आली आहे. त्याचे पर्यावसन इथल्या मागासवर्गीय समाजाला हिंदू धर्मात हिंदू असूनही केवळ वर्णव्यवस्थेमुळे अनन्वित अत्याचार सहन करावे लागले आंबेडकरांनी मात्र सगळ्या वर्णव्यवस्थेचे तीनतेरा करुन मानवाच्या मुक्तीलाच सर्वांत जास्त प्राधान्य दिले.

भारतातल्या सर्व जातीव्यवस्थेला नेस्तनाबूत करताना आणि समस्त मानवाला एकसंध बांधताना त्यांनी राज्यघटनेचा समान धागा दिला. परंतु आंबेडकरांनी धर्मांतर केल्यामुळे त्यांना केवळ दलितांचे नेते म्हणूनच इथली जवळपास सर्वच मंडळी पाहत असते आणि जे शोषित पिडित घटनेच्या आणि न्याय हक्कांच्या माध्यमातून इतकी प्रगती करत माणूस म्हणून जगत आहेत त्यांना सुद्धा बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान व्यक्ती म्हणजे राष्ट्रीय संपत्ती आहे परंतु इथल्या जातीव्यवस्थेतली अदृश्य बेडी प्रत्येक नेत्याला जातीच्या बेडीत अडकवून अजूनही दुपट्टीपणाच करतेय हे पण नागव सत्य आहे आणि ही जातीयतेची अमानवी खदखद अजूनही कुठे ना कुठे बाहेर पडत असल्याचे दिसून येते.

असो.. आंबेडकरांबद्दल माझ्या सारख्या पामराने काय लिहावे... विद्वत्तेचे महामेरु... क्रांतीसूर्य... घटनापती... शिक्षणाला महत्व देत शिका... संघटित व्हा... आणि संघर्ष करा असे म्हणणारे बाबासाहेब आंबेडकर हे अख्ख्या देशाचे आहेत आणि एक भारतीय म्हणून मला त्याचा सार्थ अभिमान आहे. ज्यांच्या मुळे ही लेखणी या हातात धरायचे सामर्थ्य आले. मोकळे श्वास घेऊ शकलो. ज्यांच्यामुळे माणूस म्हणवून घेत आहे. ज्यांच्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य काय आहे याची जाणिव झाली आहे त्या महामानवाच्या जन्मदिनानिमित्त सर्व भारतीयांना खूप खूप शुभेच्छा!

## धम्म देसना

शांत चित्तात
ऐकू येत राहतो
देसनेचा स्वर निरंतर
एखाद्या पुरातन गुफेतून
निनादत येणाऱ्या
प्रतिध्वनी सारखा उतरत जातो
आपल्याच आतल्या आत
अंतरंगांत !
हे करुणेचे असीम दान
वाहत राहते
आपल्याच आतल्या आत
एखाद्या नदीसारखे अव्याहत...
आपणच आपल्या आत
भरुन जातो काठोकाठ
आपण होत जातो
पाण्यासारखे पारदर्शी
आपल्या पात्रात आपण पाहू शकतो
आपलेच प्रतिबिंब
ऐकू शकतो नाद
आपलाच खळाळत वाहण्याचा
येतो आपल्याला पूर वारंवार
आपण मावत नाही
आता आपल्याच काठात
आपले डोळे येऊ लागतात
भरुन परत परत!
आता आपणच
सापडत जातो आपल्याला वारंवार
बोधिवृक्षाच्या पारंब्यागत
आपण विस्तारत जातो अपार
आपल्याच आत
आपल्याला सापडत जातो
माती आणि आकाशातला
आपलाच अंश
आता आपल्यालाच
त्वचेच्या पलीकडे
जाऊ शकतो आपण सहजपणे
करु शकतो हितगूज
कोणत्याही हुंदक्याशी...
आता आपल्या डोळ्यांना
करु शकत नाहीत दिशा बंदिस्त
कळू लागते
आपल्याला मुंग्यांची अव्यक्त भाषा
आपल्या आवाजात
एकजीव होत जाते मंगलकामना
सृष्टीची, समष्टीची...
फुलांनी लगडलेल्या
वृक्षासारखे दरवळू लागतो आपण
दिव्याच्या ज्योतीचे तेज
सामावून जाते आपल्यात
आपण होत जातो अधिकाधिक देखणे!
एखाद्या पुरातन प्रस्तरावर
कोरलेल्या लिपी सारखा
दिसू लागतो
आपल्याला आपला चेहरा
जणू त्या पुरातन शिलालेखावरील लिपीच्या वर्णमालेतील
मुळाक्षरांसारखे
आपलेच डोळे...
उजळून येतात परत परत
काळाच्या कोणत्याही तुकड्यात !
आता देसनेची ग्वाही
आपल्या श्वासोश्वासात
आपल्या वर्तमानात
आपल्या शब्दाशब्दांत !

***- वैभव सोनारकर***
मोबा. ९९६०१४३९५१